RNI NO. MAHMAR/2020/84035

कायदेविषयक मार्गदर्शन मोफत
संपर्क
ॲड. सुशीला
मो नं 8766507294

BAHUJAN SAURABHA
# बहुजन सौरभ

**दि. 28 फेब्रुवारी 2026**



राष्ट्रीय विज्ञान दिवस.
1932- मद्रास येथे अस्पृश्य, ख्रिश्चन, मुसलमान, ब्राम्हणेतरांतर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भव्य स्वागत.
संकलन प्रा. यशवंत दुपटे

शनिवार, २८ फेब्रुवारी २०२६ | वर्ष : ६ | अंक : ६२ | दैनिक | किंमत : ₹ ५/-
Saturday, 28 February 2026 | Year : 6 | Issue : 62 | Daily | Rate: Rs. 5/-

## मणिपूरमध्ये पाच दहशतवाद्यांना अटक



**इंफाळ :** सुरक्षा दलांनी मणिपूरच्या खोऱ्यातील जिल्ह्यांमधून विविध बंदी घातलेल्या संघटनांशी संबंधित पाच दहशतवाद्यांना अटक केली आहे, असे पोलिसांनी शुक्रवारी सांगितले. दोन जिल्ह्यांमध्ये वेगवेगळ्या कारवाईत किमान 10 शस्त्रे आणि मोठ्या प्रमाणात दारूगोळा जप्त करण्यात आला. पोलिसांनी दिलेल्या निवेदनानुसार, बुधवारी इम्फाळ पूर्व जिल्ह्यातील कोइरेंगेई मानुंग लायखोन लीकाई भागातून बंदी घातलेल्या पीपल्स लिबरेशन आर्मीच्या एका सक्रिय सदस्याला अटक करण्यात आली. त्याच्याकडून संघटनेचे तीन बॅनर जप्त करण्यात आले. त्याच दिवशी इम्फाळ पूर्व जिल्ह्यातील याइंगांगपोक्पी येथून बंदी घातलेल्या संघटनेच्या इतर दोन कार्यकर्त्यांनाही अटक करण्यात आली. पोलिसांच्या निवेदनानुसार, त्यांच्याकडून एक हॅंडग्रेनेड, एक डेटोनेटर आणि दारूगोळा जप्त करण्यात आला.

**इंफाळ :** मणिपूरमधील सुरक्षा दलांनी खोऱ्यातील जिल्ह्यांमधील विविध बंदी घातलेल्या संघटनांमधील पाच दहशतवाद्यांना अटक केली. या कारवाईत 10 बंदुका, एक हातबॉम्ब, डेटोनेटर आणि दारूगोळा जप्त करण्यात आला. ही कारवाई मणिपूरमध्ये सुरू असलेल्या शोध मोहिमेचा भाग आहे, जिथे गेल्या दोन वर्षांपासून जातीय हिंसाचार सुरू आहे.

बुधवारी इम्फाळ पूर्व जिल्ह्यातील कोइरेंगेई मानुंग लायखोन लीकाई भागातून प्रतिबंधित पीपल्स लिबरेशन आर्मीच्या एका सक्रिय कॅडरला अटक करण्यात आली, असे पोलिसांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. त्याच्याकडून संघटनेचे तीन बॅनर जप्त करण्यात आले. त्याच दिवशी इम्फाळ पूर्व जिल्ह्यातील यांगंगपोक्पी येथून बंदी घातलेल्या संघटनेच्या आणखी दोन कार्यकर्त्यांना अटक करण्यात आली. त्यांच्याकडून एक हॅंडग्रेनेड, एक डिटोनेटर आणि दारूगोळा जप्त करण्यात आला, असे पोलिसांच्या निवेदनात म्हटले आहे.

इम्फाळ पश्चिम जिल्ह्यातील वाहेंग खुमान भागातून संघटनेच्या आणखी एका सदस्याला अटक करण्यात आली, असे त्यात म्हटले आहे. गुरुवारी इम्फाळ पूर्वेतील लिशम लीराक येथील त्याच्या निवासस्थानातून बेकायदेशीर केसीपी (पीएससी) च्या एका सक्रिय कॅडरला अटक करण्यात आली, असे पोलिसांनी सांगितले.





गुरुवारी इम्फाळ पूर्व जिल्ह्यातील लायरो चिंग भागात केलेल्या कारवाईत सुरक्षा दलांनी शस्त्रास्त्रे आणि दारूगोळ्याचा साठा जप्त केला. बुधवारी काकचिंग जिल्ह्यातील पामचौ टेकडीवर झालेल्या दुसऱ्या कारवाईत अनेक शस्त्रे आणि दारूगोळा जप्त करण्यात आला, असे पोलिसांच्या निवेदनात म्हटले आहे.

दोन वर्षांपूर्वी मणिपूरमध्ये वांशिक हिंसाचार सुरू झाल्यापासून सुरक्षा दलांकडून शोध मोहीम राबवली जात आहे. मे 2023 पासून मेतेई आणि कुकी-झो गटांमधील वांशिक संघर्षात 260 हून अधिक लोक मारले गेले आहेत आणि हजारो बेघर झाले आहेत.

## दारु घोटाळा प्रकरणात अरविंद केजरीवाल यांच्यासह मनीष सिसोदिया यांची सर्व आरोपांतून मुक्तता

**नवी दिल्ली :** राऊस अव्हेन्यू न्यायालयाने शुक्रवारी माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल आणि माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांच्यासह अनेकांना निर्दोष मुक्त केले. या प्रकरणात बहुचर्चित उत्पादन शुल्क धोरणाशी संबंधित कथित भ्रष्टाचाराचा समावेश होता. न्यायालयाने आपल्या निकालात म्हटले आहे की प्रथमदर्शनी कोणताही गुन्हेगारी कट रचला गेला नाही. तथापि, मनी लॉंड्रिंग प्रकरणात केजरीवाल यांना दिलासा देण्यात आला नाही. न्यायालय सीबीआय प्रकरणाची सुनावणी करत होते.



दिल्ली दारू धोरण घोटाळ्याशी संबंधित केंद्रीय अन्वेषण ब्युरोने दाखल केलेल्या प्रकरणात राऊस अव्हेन्यू न्यायालयाने मोठा निकाल दिला आहे. न्यायालयाने दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल आणि माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांची निर्दोष मुक्तता केली आहे. या निकालानंतर अरविंद केजरीवाल यांनी त्यांच्या निवासस्थानापासून पक्ष कार्यालयापर्यंत रोड शो केला. रोड शो दरम्यान त्यांनी हातात गदा घेऊन समर्थकांचे स्वागत केले. पत्रकार परिषदेत केजरीवाल यांनी न्यायालयाच्या निर्णयाला ऐतिहासिक म्हटले. त्यांनी पंतप्रधान मोदी आणि अमित शहा यांनी आम आदमी पक्षाविरुद्ध मोठे षड्यंत्र रचल्याचा आरोप केला. केजरीवाल म्हणाले की, मोदी आणि शाह यांनी संपूर्ण देशाची माफी मागावी. त्यांनी प्रधानमंत्री मोदींना दिल्लीत नव्याने निवडणुका घेण्याचे आव्हानही दिले. केजरीवाल यांनी दावा केला की, जर भाजपने दहापेक्षा जास्त जागा जिंकल्या तर ते राजकारण सोडतील. ते म्हणाले की, तुरुंगात गेल्याने त्यांच्यावर परिणाम होतो आणि त्यांच्या कुटुंबावर त्याचा परिणाम होतो. केजरीवाल यांनी भाजप सरकारवर दिल्लीची स्थिती बिघडवल्याचा आरोप केला. ते म्हणाले की, न्यायालयाने खोट्याचा किल्ला उद्ध्वस्त केला आहे. न्यायालयाच्या जवळजवळ 600 पानांच्या आदेशात खटला चालवण्यासाठी पुरेसे पुरावे सापडले नाहीत. दिल्ली दारू धोरण प्रकरणात केंद्रीय अन्वेषण विभागाने उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. शुक्रवारी कनिष्ठ न्यायालयाने अरविंद केजरीवाल आणि इतरांना सीबीआय प्रकरणातून निर्दोष मुक्त केले. या आदेशाला आव्हान देत सीबीआयने उच्च न्यायालयात अपील दाखल केले आहे.

### प्रत्येक कार्यकर्ता कट्टर प्रामाणिक आहे

केजरीवाल म्हणाले की, आम आदमी पक्षाचा प्रत्येक कार्यकर्ता कट्टर प्रामाणिक आहे. त्यांनी आरोप केला की गेल्या चार वर्षांपासून अंमलबजावणी संचालनालय आणि सीबीआय सारख्या एजन्सींचा वापर केला जात आहे. केजरीवाल यांनी याला पंतप्रधान मोदी आणि अमित शहा यांचे षड्यंत्र म्हटले. त्यांनी दोन्ही नेत्यांनी देशाची माफी मागावी अशी मागणी केली. केजरीवाल यांनी कॉंग्रेसवरही प्रत्युत्तर दिले

## महाराष्ट्र लोकसेवा परीक्षेचा निकाल जाहीर

**नवी दिल्ली :** महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा 2025 चा निकाल जाहीर झाला आहे. मुख्य परीक्षेसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. यंदा कट-ऑफ विक्रमी लागल्याने परीक्षेतील स्पर्धा वाढल्याचे दिसून येत आहे. यावेळी हा निकाल जाहीर करण्यासाठी आयोगाने बराच वेळ घेतला आहे. तब्बल साडे तीन महिन्यांपेक्षा जास्त काळानंतर हा निकाल जाहीर करण्यात आला आहे. ही परीक्षा दिलेले उमेदवार आता पुढील तयारीला लागू शकतात. निकालात पूर्व परीक्षेतील बैठक क्रमांकासह नावाचा उल्लेख करण्यात आला आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत 9 नोव्हेंबर 2025 रोजी घेण्यात आलेल्या महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा 2025 (राज्य सेवा गट-अ व गट-ब) चा निकाल आयोगाच्या संकेतस्थळावर शुक्रवारी (27 फेब्रुवारी) जाहीर करण्यात आला. या पूर्व परीक्षेतून मुख्य परीक्षेसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या बैठक क्रमांकासह नावांची यादी आणि गुणांची सीमारेषा (कट-ऑफ) आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. या निकालात प्रवर्गनिहाय कट-ऑफ पुढीलप्रमाणे जाहीर करण्यात आला आहे. सामान्य प्रवर्गासाठी पुरुषांचा कट-ऑफ 116 गुण, तर महिलांचा 111 गुण आहे. एससी प्रवर्गात पुरुषांचा कट-ऑफ 109 गुण आणि महिलांचा 104 गुण आहे. एसटी प्रवर्गात पुरुषांसाठी 99 गुण, तर महिलांसाठी 94 गुण कट-ऑफ निश्चित करण्यात आला आहे. इतर मागासवर्गीय (ओबीसी) प्रवर्गात पुरुषांचा कट-ऑफ 116 गुण असून महिलांचा 111 गुण आहे. ईडब्ल्यूएस (EWS) प्रवर्गात पुरुषांचा कट-ऑफ 103 गुण, तर महिलांचा 99.50 गुण आहे. तसेच एसईबीसी प्रवर्गात पुरुषांसाठी 116 गुण आणि महिलांसाठी 111 गुण असा कट-ऑफ जाहीर करण्यात आला आहे.





### एमपीएससी व यूपीएससीच्या पूर्वप्रशिक्षणासाठी 'सारथी'मधील जागांत वाढ

**राहाता :** 'सारथी' संस्थेमार्फत पूर्व प्रशिक्षणासाठी केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (युपीएससी) 100 जागांवरून 400 तर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) 400 जागा वरून 1 हजार जागा निर्माण करण्यास राज्याच्या मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या समितीने मान्यता दिल्याची माहिती मंत्रिमंडळाच्या मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे यांनी दिली. याबरोबरच 'सारथी'ने उद्योजकांच्या संघटनांशी संपर्क ठेवून औद्योगिक व सेवा क्षेत्रात मागणी असलेल्या कौशल्य प्रशिक्षणाचे कार्यक्रम सुरू करावेत, यासाठी नामांकित प्रशिक्षण संस्थांचे मार्गदर्शन घ्यावे, अशीही सूचना केली आहे.





## महत्त्वाच्या बातम्या

### नागपुरात बारावीचा गणिताचाही फुटला पेपर

**नागपूर :** बारावीच्या पेपरफूट प्रकरणात अटकेतील आरोपींची कसून चौकशी सुरू असताना आणखी एक धक्कादायक बाब समोर आली आहे. आरोपींनी बारावीच्या गणिताचा पेपरदेखील फोडला होता. आरोपींच्या फोनमधील डिलीट झालेल्या व्हॉट्सअप चॅटमध्ये गणिताची प्रश्नपत्रिका आढळून आली. ही प्रश्नपत्रिका पाठविणाऱ्या पाचव्या आरोपीचा शोध सुरू आहे. सिव्हिल लाइन्स परिसरातील सेंट उर्सुला हायस्कूलमधील परीक्षा केंद्रावर बुधवारी (दि.18) रसायनशास्त्राचा पेपर होता. तेथील एका विद्यार्थिनीच्या मोबाइलमधील व्हॉट्सॲप ग्रुपवर परीक्षा सुरू होण्यापूर्वीच पेपर आलेला होता, तसेच त्याच ग्रुपवर प्रश्नांची उत्तरेसुद्धा आलेली होती. संबंधित विद्यार्थिनीने तिच्या मैत्रिणीचेही नाव सांगितले. विद्यार्थिनींच्या मोबाइलमध्ये16 फेब्रुवारी रोजी झालेला भौतिकशास्त्राचाही पेपर सापडला. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) अनिल दहीफळे यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी पेपर फोडणाऱ्यावर गुन्हा दाखल केला होता. पोलिसांनी 'एक्सआयआय' या व्हॉट्सॲप ग्रुपचा ॲडमिन निशिकांत मूल (45, मानकापूर) व फरहान अख्तर (19, कामगारनगर), एक्सेलेन्ट अकॅडमीचा संचालक मुस्तफा खान मुनीर खान (42, भानखेडा) व जुनेद अहमद (42, हसनबाग) यांना अटक केली.

### एमआयडीसी 411 एकरांतील बंद पडलेले 301 भूखंड घेणार परत

**नागपूर :** विदर्भातील औद्योगिक विकासाला गती देण्यासाठी आणि सुशिक्षित तरुणांच्या हाताला स्थानिक पातळीवर काम मिळवून देण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) आता 'ॲक्शन मोड'वर आले आहे. नागपूर विभागांतर्गत नागपूर, भंडारा, गोंदिया आणि वर्धा या चार जिल्ह्यांतील 34 औद्योगिक क्षेत्रात बंद पडलेले आणि नियमांचे उल्लंघन करणारे 411 एकरांतील 301 भूखंड परत घेण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. नागपूर विभागात (चार जिल्ह्यांत) एकूण 6,429 भूखंडांचे वाटप करण्यात आले होते. मात्र, सद्यःस्थितीत 301 उद्योग अनेक वर्षांपासून बंद असून त्यांनी या जागांचा ताबा अद्याप सोडलेला नाही. हे उद्योग नियमानुसार ठराविक कालावधीत बांधकाम करण्यात किंवा उत्पादन सुरू करण्यात अपयशी ठरले आहेत. अशा उद्योजकांना नोटिसा बजावण्यात आल्याचे नागपूर विभागाचे प्रादेशिक व्यवस्थापक मनोहर पोटे यांनी स्पष्ट केले. या नोटिसांनंतर एमआयडीसी प्रत्यक्ष जमिनीचा ताबा घेण्याची कारवाई सुरू करणार आहे. 'भूखंडाचे क्षेत्रफळ आणि उद्योग सुरू करण्याचा कालावधी याबाबत एमआयडीसीचे स्पष्ट नियम आहेत. या नियमांचे पालन करणे उद्योजकांचे कर्तव्य आहे. बंद पडलेली जागा परत घेऊन ती खन्य अर्थाने गरजू आणि नवीन उद्योजकांना देणे हे सरकारचे धोरण आहे. बंद उद्योगांना नोटीस पाठविल्या असून, लवकरच कारवाई होईल.







“ ज्ञान हेच खरे संपत्ती आहे... ”



बहुजन सौरभ

## संपादकीय

### विज्ञानवाद - बुद्ध-आंबेडकरांची खरी दिशा

भारतामध्ये 28 फेब्रुवारी हा दिवस सी. वी. रमण यांच्या स्मरणार्थ राष्ट्रीय विज्ञान दिवस म्हणून साजरा केला जातो. 1928 मध्ये त्यांनी शोधलेला 'रमण परिणाम' (Raman Effect) हा भारतीय विज्ञानाच्या इतिहासातील मैलाचा दगड मानला जातो. परंतु केवळ विज्ञान दिवस साजरा करणे आणि प्रत्यक्ष जीवनात विज्ञानवादी होणे यामध्ये जमीन-आसमानाचा फरक आहे. आजचा मूलभूत प्रश्न असा आहे की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि तथागत बुद्ध यांच्या तत्त्वज्ञानानुसार विज्ञानवाद म्हणजे नेमके काय? आणि बहुजन समाज खरोखर विज्ञानवादी आहे का? विज्ञानवाद म्हणजे काय? विज्ञानवाद म्हणजे केवळ प्रयोगशाळेतील संशोधन नव्हे; तो विचार करण्याची पद्धत आहे. तथागत गौतम बुद्ध यांनी कालाम सूत्रात स्पष्ट सांगितले, 'एखादी गोष्ट केवळ परंपरा, गुरु, शास्त्र किंवा बहुसंख्य लोक मानतात म्हणून खरी मानू नका; स्वतः तपासा, अनुभव घ्या आणि बुद्धीला पटली तरच स्वीकारा.' हीच वैज्ञानिक दृष्टी आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनीही 'शिका, संघटित व्हा, संघर्ष करा' हा मंत्र देताना शिक्षण म्हणजे विवेकाची कास धरणे असे सांगितले. त्यांच्या मते धर्मसुद्धा तर्कसंगत, मानवी मूल्यांवर आधारित आणि सामाजिक न्यायाला पोषक असला पाहिजे. म्हणूनच त्यांनी बौद्ध धर्म स्वीकारला, कारण तो तर्क, अनुभव आणि करुणेवर आधारित आहे. म्हणून विज्ञानवाद म्हणजे, अंधश्रद्धेवर प्रश्न विचारणे, पुराव्यावर आधारित निर्णय घेणे, समानता आणि मानवतावाद मान्य करणे, भावनांपेक्षा तर्काला प्राधान्य देणे, बहुजन समाज खरोखर विज्ञानवादी आहे का? सडेतोड उत्तर द्यायचे तर, अजून पूर्णपणे नाही. बहुजन समाज ऐतिहासिकदृष्ट्या शोषित राहिला. शिक्षणापासून दूर ठेवण्यात आला. त्यामुळे अंधश्रद्धा, कर्मकांड, देवदेवता, जत्रा, बुवा-बाबा यांचे जाळे अजूनही समाजात घट्ट आहे. आंबेडकरी चळवळीत बुद्ध आणि आंबेडकरांचे फोटो लावले जातात; पण त्यांच्या विचारांचा तर्कशुद्ध अंगीकार कितपत होतो? आजही, कुंडली, वास्तु, ग्रह-शांती यांवर लाखो रुपये खर्च होतात. अंधश्रद्धेमुळे वैद्यकीय उपचार टाळले जातात. जातीय श्रेष्ठत्वाच्या मिथकांवर विश्वास ठेवला जातो, हे विज्ञानवाद नाही. केवळ 'जय भीम' म्हणणे म्हणजे विज्ञानवाद नव्हे; तर आंबेडकरांच्या तर्कवादी भूमिकेला जीवनात उतरवणे म्हणजे विज्ञानवाद. विज्ञान दिवस आणि वास्तव, 28 फेब्रुवारीला शाळा-कॉलेजांत भाषणे होतात, पोस्टर लावली जातात, सी. वी. रमण यांचा गौरव केला जातो. पण प्रश्न असा आहे की, आपण रमणांच्या प्रयोगशील वृत्तीचा स्वीकार केला का? भारत आजही अंधश्रद्धा, जातीयता आणि छद्म-विज्ञानाच्या विळख्यात आहे. सोशल मीडियावर खोटे वैज्ञानिक दावे, इतिहासाचे विकृतीकरण आणि धार्मिक मिथकांना विज्ञानाचा मुलामा देण्याची प्रवृत्ती वाढत आहे. हे विज्ञान दिनाच्या आत्म्याला विरोधी आहे. जर रमण परिणाम प्रयोगशाळेत सिद्ध झाला असेल, तर सामाजिक जीवनात 'तर्क परिणाम' का दिसत नाही? विज्ञान दिवस हा फक्त कार्यक्रम न राहता तो विवेक जागृतीचा दिवस व्हायला हवा. बुद्ध आणि आंबेडकरांचा विज्ञानवाद, गौतम बुद्ध यांनी आत्मा, ईश्वर, यज्ञ यांवर अवलंबून न राहता 'प्रतित्यसमुत्पाद' मांडला. कारण, परिणामाचा नियम. ही शुद्ध वैज्ञानिक विचारसरणी आहे. डॉ. आंबेडकर यांनी संविधान लिहिताना व्यक्तिस्वातंत्र्य, समता आणि बंधुता यांना केंद्रस्थानी ठेवले. संविधान म्हणजे सामाजिक विज्ञानाचा उत्कृष्ट दस्तऐवज आहे. आंबेडकरांनी स्पष्ट सांगितले, 'मनुष्य महान आहे. कारण तो विचार करतो.' हा विचार करण्याचा अधिकार म्हणजेच विज्ञानवाद. मग विद्वान विज्ञानवादी कसे होतील? 1. पुराव्याशिवाय काहीही स्वीकारू नका - धार्मिक, राजकीय किंवा सामाजिक दावे तपासा. 2. अंधश्रद्धेविरुद्ध उभे रहा - घरात, समाजात, संघटनेत विवेकाची बाजू घ्या. 3. संशोधन वृत्ती वाढवा - केवळ पदवी नव्हे; प्रश्न विचारण्याची सवय लावा. 4. संविधानाचा अभ्यास करा - सामाजिक न्याय हेही विज्ञानवादी मूल्य आहे. 5. बुद्ध-आंबेडकरांचे मूळ लेखन वाचा - केवळ भाषणे नव्हे, तर तत्त्वज्ञान समजून घ्या. 6. विज्ञान आणि नैतिकता यांचा संगम साधा -तंत्रज्ञानाचा उपयोग मानवी कल्याणासाठी करा. सडेतोडपणे सांगायचे झाले तर बहुजन समाजाचा इतिहास संघर्षाचा आहे; पण आता संघर्षाचा केंद्रबिंदू विवेक असला पाहिजे. विज्ञान दिवस साजरा करून फोटो काढणे पुरेसे नाही. जर आपण अजूनही ग्रह-शांती, जात-पात, बुवा-बाबा यांवर विश्वास ठेवत असू, तर आपण बुद्ध-आंबेडकरांचे अनुयायी म्हणवून घेण्याचा नैतिक अधिकार गमावतो. विज्ञानवाद म्हणजे प्रयोगशाळेतील उपकरण नव्हे; तो मेंदूतील दिवा आहे. तो दिवा पेटवण्यासाठी धैर्य लागते, परंपरेला प्रश्न विचारण्याचे धैर्य. आज गरज आहे ती विज्ञानवादी बहुजन समाजाची, जो भावनेपेक्षा तर्कावर, अंधश्रद्धेपेक्षा पुराव्यावर आणि अन्यायापेक्षा समतेवर विश्वास ठेवेल. सी. वी. रमण यांनी प्रकाशाच्या कणांमध्ये बदल दाखवला; बुद्धांनी विचारांच्या कणांमध्ये क्रांती घडवली; आंबेडकरांनी समाजरचनेत परिवर्तन घडवले. आता प्रश्न असा आहे, आपण स्वतःमध्ये परिवर्तन घडवणार आहोत का? जर उत्तर 'होय' असेल, तरच विज्ञान दिवसाला खरा अर्थ येईल. अन्यथा तो केवळ दिनदर्शिकेतील एक औपचारिक दिवस राहील. ■ ■

# विद्यापीठ अनुदान आयोग, आणि सामाजिक न्याय

## उच्चवर्णीय समाजानेही का आवाज उठवावा?

अलीकडच्या काळात University Grants Commission (UGC) संदर्भातील धोरणे, विद्यापीठातील भरती प्रक्रिया, आरक्षण अंमलबजावणी, संशोधन संधी आणि स्वायत्ततेचे प्रश्न यावर मोठी चर्चा सुरू आहे. अनेकांना हा विषय केवळ दलित-बहुजन, मागासवर्गीय किंवा अल्पसंख्याक विद्यार्थ्यांचा प्रश्न वाटतो. परंतु वस्तुस्थिती अशी आहे की, विद्यापीठातील अन्याय हा संपूर्ण समाजाच्या भवितव्याशी निगडित असतो. म्हणूनच समाजातील उच्चवर्णीय घटकांनीही या मुद्द्यावर ठाम आणि तत्त्वनिष्ठ भूमिका घेणे आवश्यक आहे.




**1. विद्यापीठ म्हणजे राष्ट्राची बौद्धिक प्रयोगशाळा :-** विद्यापीठे केवळ पदवी देणारी संस्था नाहीत; ती राष्ट्राच्या बौद्धिक, वैज्ञानिक आणि नैतिक दिशेची निर्मिती करतात. जर भरती प्रक्रियेत पारदर्शकता नसेल, आरक्षणाची योग्य अंमलबजावणी नसेल किंवा गुणवत्तेच्या नावाखाली सामाजिक बहिष्कार होत असेल, तर त्याचा परिणाम संशोधनाच्या दर्जावर आणि सामाजिक सलोख्यावर होतो. उच्चवर्णीय समाजातील विद्यर्थ्यांनाही अखेरीस अशाच संस्थांमध्ये शिकायचे, संशोधन करायचे आणि नोकरी करायची आहे. त्यामुळे अन्यायाविरुद्धचा आवाज हा केवळ नैतिक कर्तव्य नसून भविष्यातील पिढ्यांच्या हिताचा प्रश्न आहे.

**2. संविधानिक मूल्यांची जबाबदारी सर्वांची :-** भारतीय राज्यघटना समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि सामाजिक न्याय यांची हमी देते. बी. आर आंबेडकर यांनी संविधान रचताना शिक्षणाला सामाजिक परिवर्तनाचे प्रमुख साधन मानले. आरक्षण किंवा सकारात्मक कृती (affirmative action) ही कोणावर अन्याय करण्याची व्यवस्था नसून ऐतिहासिक विषमता दूर करण्याचे साधन आहे. जर विद्यापीठांमध्ये आरक्षणाची अंमलबजावणी टाळली जात असेल किंवा नियुक्त्या पारदर्शक नसतील, तर ते संविधानिक तत्वांना बाधक ठरते. उच्चवर्णीय समाजाने या तत्वांचे रक्षण करणे ही देखील लोकशाहीची जबाबदारी आहे. लोकशाही केवळ बहुमतावर चालत नाही; ती न्याय आणि समान संधीवर उभी असते.

**3. गुणवत्तेचा प्रश्न आणि गैरसमज :-** काही वेळा आरक्षण आणि गुणवत्ता हे परस्परविरोधी असल्याचा गैरसमज पसरवला जातो. प्रत्यक्षात गुणवत्ता ही संधी, संसाधने आणि पोषण यांवर अवलंबून असते. ग्रामीण किंवा सामाजिकदृष्ट्या वंचित पार्श्वभूमीतील विद्यार्थी जेव्हा समान संधी मिळवतात, तेव्हा तेही उत्कृष्ट कामगिरी करतात, हे अनेक उदाहरणांतून सिद्ध झाले आहे. म्हणूनच, उच्चवर्णीय समाजाने गुणवत्तेच्या नावाखाली सामाजिक बहिष्कार होऊ नये यासाठी भूमिका घेतली पाहिजे. गुणवत्ता आणि समता या दोन्ही गोष्टी परस्परपूरक आहेत, विरोधी नाहीत.

**4. अन्यायाचा विस्तार सर्वांवर :-** आज जर एखाद्या गटावर अन्याय होत असेल आणि आपण शांत राहिलो, तर उद्या तो अन्याय इतरांवरही लागू शकतो. भरती प्रक्रिया, निधी वाटप, संशोधन स्वातंत्र्य, अभिव्यक्ती स्वातंत्र्य हे प्रश्न सर्वांसाठी समान आहेत. जर विद्यापीठातील स्वायत्तता कमी झाली, तर त्याचा फटका सर्व विद्यार्थ्यांना बसतो. त्यामुळे हा प्रश्न केवळ जातीय राजकारणाचा न ठेवता शैक्षणिक स्वातंत्र्य आणि संस्थात्मक प्रामाणिकतेचा ठेवला पाहिजे.



अरविंद गेडाम
मो.7498564512

**5. सामाजिक ऐक्य आणि बंधुता :-** भारतीय समाजात दीर्घकाळ जातीय विषमता राहिली आहे. या पार्श्वभूमीवर सामाजिक ऐक्याची निर्मिती करणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. उच्चवर्णीय समाजाने जर खुलेपणाने सामाजिक न्यायाच्या बाजूने भूमिका घेतली, तर ते बंधुतेच्या तत्त्वाला बळकटी देईल. बंधुता म्हणजे केवळ सहिष्णुता नव्हे; ती सक्रिय समर्थन आहे. अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे म्हणजे दुसऱ्याच्या हक्कांचे संरक्षण करणे, आणि त्यातून स्वतःच्या मानवतेचे जतन करणे.

**उपाय आणि पुढची दिशा :-**
1)विद्यापीठातील भरती व प्रवेश प्रक्रियेत पारदर्शकता मागणे. 2)आरक्षण अंमलबजावणीचे नियमित परीक्षण. 3)संशोधन आणि निधी वितरणातील समान संधी. 4)विविध सामाजिक घटकांमध्ये संवाद आणि संयुक्त मंच उभारणे. हा संघर्ष कोणत्याही समाजघटकाविरुद्ध नसून अन्यायाविरुद्ध आहे. विद्यापीठे जर न्याय्य, समताधिष्ठित आणि पारदर्शक असतील, तर संपूर्ण राष्ट्राचा बौद्धिक पाया मजबूत राहील.

UGC आणि विद्यापीठातील अन्यायाचा प्रश्न हा एका विशिष्ट समाजघटकापुरता मर्यादित नाही. तो लोकशाही, संविधानिक मूल्ये आणि भविष्यातील पिढ्यांच्या संधींचा प्रश्न आहे. उच्चवर्णीय समाजाने जर सामाजिक न्यायाच्या बाजूने उभे राहून तत्त्वनिष्ठ भूमिका घेतली, तर ते केवळ दलित-बहुजन विद्यार्थ्यांचे नव्हे, तर संपूर्ण भारतीय शिक्षणव्यवस्थेचे रक्षण ठरेल. लोकशाहीची खरी परीक्षा तेव्हाच होते, जेव्हा बहुसंख्य किंवा सत्ताधारी नव्हे, तर सर्व समाजघटक न्यायाच्या बाजूने एकत्र उभे राहतात. विद्यापीठे ही संघर्षाची नव्हे, तर समतेची आणि प्रगतीची भूमी बनावी, हीच आजची गरज आहे. ■ ■

# होळी-धुलीवंदन !

## आनंदाचा सण विकृतीकडे जात आहे !!


बहुजन सौरभ

**3 मार्च संपन्न होणार श्रीगुरुदेव सेवा मंडळ धुलिवंदन महोत्सव, विश्वकर्मा नगर, नागपूर, 50 वर्षापेक्षा जास्त वर्षाची आदर्श परंपरा जोपासतो आहे. यावर्षी राष्ट्रीय युवा प्रबोधनकार तुषार सुर्यवंशी यांच प्रबोधन होणार!**

वसंत ऋतूचे आगमन भारतीय जनजीवनात आनंदोत्सव घेऊन येते. झाडांची पतझड होऊन नव्या पालवीचे आगमन होते. पळसाची फुले, काटसूराचा मोहक रंग आणि त्यावर फिरणाऱ्या मधमाशा मन मोहवतात. अशा निसर्गोत्सवाचे स्वागत म्हणून होळी-धुलिवंदन साजरे केले जाते. परंतु अलीकडे या सणाचा आनंद विकृतीकडे झुकताना दिसतो आहे. निवडणुकांचे निकाल, वाढदिवस, नवीन वर्ष अशा निमित्तांनी दारू-मटनाच्या पार्ट्या वाढल्या आहेत. आनंद आणि उन्माद यातील सीमारेषा पुसट होत चालली आहे.
डीजेचा कर्णकर्कश आवाज, असंवेदनशील वर्तन, वृद्ध व रुग्णांची गैरसोय, या सगळ्यामुळे सणाचे पावित्र्य बाधित होत आहे. आनंद म्हणजे दुसऱ्याला मदत करणे; परंतु दुसऱ्याच्या त्रासाकडे दुर्लक्ष करून केलेला गोंधळ हा केवळ मनोरंजन ठरतो.

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे मार्गदर्शन :-**
'ग्रामगीता'मध्ये राष्ट्रसंतांनी होळी-धुलिवंदनाचे खरे तात्त्विक स्वरूप स्पष्ट केले आहे -
होळीचा आला शिमगा सण । त्यात मोठी मारहाण ।
लोक इभ्रत, मान सोडोन । पळती मार्गी वेडेसे ॥66॥ (ग्रा.अ. 23)
हा वाढला विचित्रपणा । ऐसा नोहे शिमगा जाणा ।
त्यातही आहे तात्त्विकपणा । घेण्यासारिखा समाजा ॥67॥ (ग्रा.अ. 23)
धुलिवंदन हा ग्रामस्वच्छतेचा आणि सामाजिक ऐक्याचा संदेश देणारा सण आहे -
या सणी मुख्य धुलिवंदन । जे ग्रामसफाईचे प्राचीन चिन्ह ।
अस्पृश्यांनाही स्पर्शावे म्हणून । सांगितले ग्रंथी त्या दिवशी ॥ 76॥(ग्रा.अ. 23)
आज उघड अस्पृश्यता कमी झाली असली तरी जातीयवाद, संप्रदायवाद आणि धर्मवाद वाढताना दिसतो. मादक पदार्थांच्या आहारी जाऊन सणाचे स्वरूप बिघडत आहे.
गावी वेगळाचि विपर्यास झाला । ग्रामशुद्धीचा उद्देश गेला ।
नाली-मोरीचा उडवोनि मैला ।
दुःख देती जनतेसि ॥81॥(ग्रा.अ. 23)
कुणाची लाकडे चोरुनि नेती । घरच्या वस्तूही होळीत टाकती ।
गाडी-घोड्यांचे सामान जाळती । खाट नेती स्मशानी ॥82॥ (ग्रा.अ. 23)
आज लाकडांच्या होळ्या कमी झाल्या असल्या तरी व्यसनांचा आणि वैमनस्याचा ज्वालामुखी वाढताना दिसतो.
या सणाने होते सणसण । गाव दिसू लागते भणभण ।
ऐसा हा प्रसंग वाईट म्हणोन । करिती टीका धीर प्राणी ॥83॥ (ग्रा.अ. 23)
परि यासि वळण लागावे । ऐसे वेडेपण होऊ न द्यावे ।
त्यात सौंदर्य, पावित्र्य भरावे । गाणे, वाजवणे ठेवोनि ॥84॥ (ग्रा.अ. 23)
होळीनिमित्ते जमवोनि नर-नारी । घ्यावया कवायती मोहल्यांवरी ।
ग्रामसुधारक नाटिका बरी । मनोरंजनासि योजावी ॥85॥ (ग्रा.अ. 23)
आदर्श परंपरा, विश्वकर्मा नगर, गेल्या 50 वर्षांहून अधिक काळ श्रीगुरुदेव सेवा मंडळ, विश्वकर्मा नगर, नागपूर येथे धुलिवंदनाची आदर्श परंपरा जपली जात आहे. या परिसरातील सर्वधर्मीय नागरिक घरासमोरील परिसर स्वच्छ करून रांगोळ्या काढतात, संत-महापुरुषांच्या प्रतिमा सजवतात. स्त्री-पुरुष, बालकांसह शेकडो नागरिक स्वच्छ वेशात, दोन-दोनच्या रांगेत शिस्तबद्ध प्रभातफेरी काढतात. राष्ट्रसंतांच्या राष्ट्रगीतांनी वातावरण भारलेले असते. प्रभातफेरीचा समारोप कीर्तन व प्रबोधनाने होतो. यावर्षी राष्ट्रीय युवा प्रबोधनकार तुषार सूर्यवंशी यांचे विशेष प्रबोधन होणार आहे. होळी-धुलिवंदन हा सण गाव आणि मनातील घाण जाळण्यासाठी आहे; घाणीत लोळण्यासाठी नाही. सर्व धर्म, पंथ आणि संप्रदायातील लोकांनी एकत्र येऊन परिवर्तनवादी, स्वच्छ आणि मानवतेचा संदेश देणारा सण साजरा करू या. आनंदाला पावित्र्याची जोड देऊ या. हीच खरी होळी, हेच खरे धुलिवंदन. ■ ■

जनक्रांतीच्या पाऊलवाटा



ज्ञानेश्वर दुर्गादास रक्षक
मो. 9823966282

## आर्थिक-शैक्षणिक स्वातंत्र्यानंतरही संघटनांची कमजोरी

# दोष नेत्यांचा की समाजाचा?

आज आंबेडकरी समाज उपाशी नाही. तो अनपढही नाही. घरे आहेत, नोकऱ्या आहेत, डिग्र्या आहेत, परदेशातून पैसे येतात, हातात स्मार्टफोन आहेत, स्टेटस अपडेट होतात, जयंतीला हजारो लोक जमतात. तरीही एक प्रश्न छळतो-हा समाज अजूनही विस्कळीत का आहे? कारण आता समस्या अन्यायाची नाही, समस्या दिशाहीन अभिमानाची आहे. आज प्रत्येक गावात संघटना आहेत. काहींना 'मिशन' आहे, काहींना 'फ्रंट' आहे, काहींना 'सेना' आहे, काहींना 'परिषद' आहे. प्रत्येक संघटनेला अध्यक्ष आहे, प्रत्येक अध्यक्षाला बॅनर आहे आणि प्रत्येक बॅनरवर डॉ. बाबासाहेबांचा फोटो आहे. पण प्रश्न असा आहे या फोटोंखाली बसून समाजासाठी एकही ठोस निर्णय का होत नाही? कारण संघटना आता समाज घडवण्यासाठी नाहीत, तर स्वतःचे अस्तित्व दाखवण्यासाठी उरल्या आहेत
**कटू सत्य ऐका :** आजचा आंबेडकरी समाज दबलेला कमी आणि फूटलेला जास्त आहे. ही फूट शत्रूने पाडलेली नाही, ही फूट आपण स्वत: निर्माण केलेली आहे 'माझी संघटना', 'माझा नेता', 'माझे व्यासपीठ' या अहंकारातून समाजाची सामूहिक बुद्धी खच्ची झाली आहे. डॉ. बाबासाहेबांनी जे संविधान दिले, ते वापरण्याऐवजी आपण ते फक्त भाषणात चघळतो. आज पैसा आहे. शिक्षण आहे. संपर्क आहे. तरीसुद्धा हा पैसा समाजात संघटित शक्ती म्हणून का उभा राहत नाही? कारण आपण वर्गणी देतो ती विद्यार्थ्यांसाठी नाही, उद्योगासाठी नाही, कायदेशीर लढ्यासाठी नाही, ती देतो स्पर्धात्मक जयंती, दिखाऊ कार्यक्रम आणि एकमेकांना पाडण्यासाठी. पैसा वाढला, पण दृष्टी वाढली नाही. डिग्र्या वाढल्या, पण दिशा नाही. संघटना म्हणजे दुकान नाही की ज्यावर 'माझे नाव' मोठ्या अक्षरात झळकावले की काम झाले. संघटना म्हणजे जबाबदारी आणि आज जवळजवळ कोणतीही संघटना आपल्याला हे सांगू शकत नाही की गेल्या एका वर्षात तिने गावात नेमके काय बदलले. किती मुलांना शिक्षण मिळाले? किती युवकांना रोजगार मिळाला? किती लोकांना संविधानाची ताकद समजली? उत्तर जर शून्य असेल, तर ती संघटना नव्हे, तो फक्त फोटोशूट ग्रूप आहे. आता स्पष्टपणे सांगायला हवे संघटना विलीन करा असे कोणी म्हणत नाही, पण संघटन मंच तयार केल्याशिवाय पुढे जाणार नाही. झेंडे बाजूला ठेवा, अहंकार खाली ठेवा आणि एक टेबलावर बसा. कारण एकत्र येणे म्हणजे शरण जाणे नाही, एकत्र येणे म्हणजे शहाणपण. डॉ. बाबासाहेबांनी सांगितले होते, संघटित व्हा. त्यांनी असे कधीच सांगितले नाही की 'तुकड्यांत विभागा आणि अध्यक्षगिरी करा'. सगळ्यात मोठा घाव पदांवर आहे. अध्यक्ष, उपाध्यक्ष, कार्याध्यक्ष, या पदांनी समाज घडलेला नाही, उलट फूटलेला आहे. पदांची भूक संपवा. समाजाला आता नावे नकोत, काम करणारे लोक हवेत. शिक्षणासाठी जबाबदार कोण? आर्थिक उपक्रमासाठी कोण? युवक-महिलांसाठी कोण? संविधान अभ्यासासाठी कोण? ज्याच्याकडे उत्तर नाही, त्याला मंचावर उभे राहण्याचा नैतिक अधिकार नाही. कार्यक्रम कमी करा, परिणाम मागा. दर तीन महिन्यांत दहा कार्यक्रम नकोत, एक समस्या सुटली पाहिजे. गावात विद्यार्थी गळती असेल तर ती थांबली पाहिजे. बेरोजगार युवक असतील तर किमान काहींना तरी दिशा मिळाली पाहिजे. नाहीतर भाषणे, ठराव, घोषणांचा काहीही अर्थ नाही. समाजाला आता 'जय भीम' ऐकायचे नाही, समाजाला 'काम झाले' हे पाहायचे आहे. युवक हा सगळ्यात मोठा विश्वासघात झालेला घटक आहे. डिग्रीधारक युवकाला तुम्ही फक्त घोषणा द्यायला, मिरवणूक काढायला आणि टाळ्या वाजवायला वापरता. त्याला निर्णय प्रक्रियेत जागा नाही, प्रोजेक्ट नाही, प्रशिक्षण नाही. मग उद्या तो युवक संघटना सोडून सिस्टममध्ये विरघळला, तर दोष त्याचा नसतो, तो दोष तुमच्या रिकाम्या नेतृत्वाचा असतो

राजेश शेलार
मो. 9326365396

**शेवटी एकच प्रश्न उरतो :** डॉ. बाबासाहेबांनी रस्ता दिला आहे, चालायचे की नाही हे कोण ठरवणार? संविधान हे तलवार नाही, ते साधन आहे. पण साधन वापरण्याची हिंमत नसेल, तर ते लोखंडच राहते. आज जर आर्थिक आणि शैक्षणिक ताकद असूनही संघटना एकत्र आल्या नाहीत, तर उद्या हा समाज केवळ नावाला जागृत राहील, वास्तवात तो राजकीय आणि सामाजिक गुलामच असेल निवड तुमची आहे. भावनिक अभिमानावर जगायचे की संघटित विवेकावर भविष्य उभे करायचे? डॉ. बाबासाहेबांचा फोटो छातीवर लावून चालायचे की त्यांचा विचार मेंदूत उतरवायचा? इतिहास एकच प्रश्न विचारेल, साधने हातात असताना तुम्ही बदल घडवला का, की फक्त घोषणा दिल्या? ■ ■

बहुजन सौरभ

# श्रीशैलम, छत्रपती शिवाजी आणि बौद्ध धम्म!

प्राच्यविद्यापंडित कॉ. शरद पाटील यांनी छत्रपती शिवाजी राजेंच्या श्रीशैलम पर्वतावरील रहस्यमय वासादरम्यानचा क्रांतिकारक इतिहास संशोधन करून मांडला आहे, तो ज्या बहुजनाला समजला असेल तो श्रीशैलम पर्वतावर जाण्याचा मोह कधीच आवरू शकत नाही. आपल्या पराक्रमी, शूर, क्रांतीकारक महापुरूषांचा इतिहास जाणून घेणे, त्यापासून प्रेरणा घेणे व महापुरूषांच्या संघर्षाची परंपरा पुढे चालू ठेवण्यासाठी प्रयत्न करणे, हे मानवी समाजाला लाभलेले एक नैसर्गिक देणे आहे. भल्या मोठ्या उंच असलेल्या तीन पर्वत-रांगा ओलांडल्यानंतर श्रीशैलमचे दर्शन प्राप्त होते. घनदाट जंगलातून अत्यंत अरूंद रस्त्यांच्या अनेक घाटांमधून कधी खोल दरीत तर कधी उंच डोंगरावरून गाडी पुढे धावत असतांना मध्येच ''अक्कमहादेवी....'' असे लिहीलेला छोटासा लाकडी बोर्ड गाडीतून ओझरता दिसला.
महान संत अक्कमहादेवीचेही ज्ञान-दर्शन घ्यावे म्हणून तेथे थांबण्याची ईच्छा झाली, परंतू थांबणे शक्य नव्हते. कारण एक दिवसाचाच दौरा होता व अंधार पडण्याच्या आत जंगलातून बाहेर पडणे बंधनकारक होते. वनविभागाला जंगलातील हिंस्त्र पशूंच्या हालचाली दिसल्यात तर त्यांच्या भीतीने रस्ते बंद केले जाण्याची शक्यता असते. अर्थात ही माहीती ड्रायव्हरने दिलेली. हैद्राबादहून सहा तासांचा प्रवास करून दुपारी 12 वाजता श्रीशैलमला पोहोचलो. जनरल दर्शन (फुकट), शीघ्र दर्शन (150 रूपये), अतिशिघ्र दर्शन (रूपये 300) व स्पर्श दर्शन (रूपये 500) असे पैसे कमविण्याचे फंडे येथेही आहेत. सर्वात आधी भव्य मंदिरात महादेव-पार्वतीच्या पिंडीचे दर्शन होते. हे मल्लिकार्जून स्वामीचे मंदिर आहे. त्यानंतर त्याच्या शेजारीच असलेल्या ब्रह्मरंभा देवीचे तुलनेने छोटे मंदिर आहे. येथे दिलेल्या माहितीनुसार शिवाच्या रूपात मल्लीकार्जून स्वामी आहेत, तर पार्वतीच्या रूपात भ्रमरांभा देवी आहे. भ्रमरांभा देवीचे हे शक्तीपीठ असुन 18 पीठांपैकी एक असल्याचे सांगीतले जाते. शिव-शक्तीचा पवित्र संगम या पर्वतावर झाल्याचे सांगीतले जाते. परंतू हे खरे नाही. महादेव व पार्वती यांच्या मंदिरात नेहमीच संयुक्त लिंग (पींड) असते. महादेवाच्या मूर्तीचे मंदिरही असते, मात्र पार्वतीचे वेगळे मंदिर कुठेही अस्तित्वात नाही. या पार्श्वभूमीवर कॉ. शरद पाटील यांनी केलेले संशोधनच खरे ठरते. सिंधू संस्कृतीच्या प्रदिर्घ वर्धिष्णू काळात भ्रमरांभादेवीचे हे मातृसत्ताक व नंतर स्त्रीसत्ताक गणराज्य स्थापन झालेले आहे. मल्लिकार्जून तेथे कसा आला? अहिराणी भाषिक खान्देशात कानबाईचा दहा दिवसाचा उत्सव आजही वर्षातून दोनदा साजरा केला जातो. कानबाई ही कानदेश = खानदेश = कान्हदेश नावाच्या गणराज्याची संस्थापिका होय! कानबाई ही गणराज्ञी तर तीचा पती कन्हेर! त्याचप्रमाणे भ्रमरांभा देवीचा पती अर्जुन असावा व त्याला मल्लिकार्जून संबोधण्यातून गणराज्ञीचे प्राधान्य अधोरेखीत होते. भ्रमरांभा देवी हे ओरिजिनल नाव आहे की नंतर बदलले याबद्दलही शंका वाटते. कारण बहुजनांचा क्रांतीकारक इतिहास पुसून टाकण्याच्या नादात ब्राह्मणवादी षडयंत्रकारी लोक महापुरूषांची, महान स्त्रीयांची व गावांचीही नावे बदलण्यात माहीर आहेत. कोल्हापुरची अंबाबाई महालक्ष्मी केव्हा झाली कळलेही नाही. तसेच भ्रमरांभा देवीचेही झाले असावे. भ्रम+रंभा = म्हणजे काय? भ्रमात टाकणारी, मोहात पाडणारी रंभा नावाची अप्सरा? एकमात्र निश्चित की येथे मातृसत्ताक व स्त्रीसत्ताक गणसमाजाचे काही अवशेष ब्राह्मणांना पुसून टाकता आलेले नाहीत. भ्रमरांभा देवीच्या मंदिरात प्रवेश करताच स्त्रीराज्य सुरू झाल्याचे लक्षात येते. मंदिराचे स्तंभ, भिंती, दरवाजे अशा सर्वच ठिकाणी स्त्रीयांच्या मुर्त्या कोरलेल्या आहेत. बाजूच्या एका मोठ्या भिंतीवर 8 ते 10 स्त्रीयांचे फोटो लावलेले आहेत. त्या भ्रमरांभा देवीच्या मंत्रीमंडळातील सदस्या असाव्यात. एकही फोटो, एकही मूर्ती पुरूषांची नाही. सर्वत्र स्त्रीयांचे फोटो व मुर्त्या!


बहुजन सौरभ

'पुष्करिणी' हा आणखी एक मोठा पुरावा होय! गणराज्य अस्तित्वात होती तोपर्यंत राजाचा राज्याभिषेक या पुष्करणीत आंघोळ करून होत असे, अशी कॉ. शरद पाटील यांनी नोंद करून ठेवलेली आहे. छ. शिवाजी श्रीशैलमवर वास्तव्यास असतांना त्यांनी मल्लिकार्जून स्वामीच्या मंदिराचे उत्तरेकडील प्रवेशद्वार बांधून दिले. 'शिवाजी गोपूरम' या नावाने हा दरवाजा ओळखला जातो. श्रीशैलमसाठी ''Sree Shivaji Memorial Committee'' छत्रपतींच्या तीनशेव्या राज्याभिषेकाच्या वर्षात 1974 साली स्थापन करण्यात आली. महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री मा. वसंतदादा पाटील यांच्या हस्ते 23 जून 1983 रोजी ''श्री. शिवाजी स्फूर्ती केन्द्रम'' वास्तूची पयाभरणी करण्यात आली. या कार्यक्रमास बाबा पुरंदरे उपस्थित होते. येथील शिवाजी पुतळ्याचे अनावरण 1994 साली तत्कालीन आरएसएस प्रमुख राजेन्द्र सिंग (रज्जूभैय्या) यांच्या हस्ते करण्यात आले. छ. शिवाजी ज्या जागेवर ध्यान (विपश्यना) करीत होते त्या जागी 2018 साली ध्यानमंदिर बांधण्यात आलेले आहे. बळीराजाने वसवलेल्या बलीपूरम (तामीळनाडू) येथील आर्किटेक्ट कॉलेजचे प्राचार्य गणपती स्थपती यांनी संपूर्ण स्फूर्ती केन्द्राचे, ध्यानमंदिराचे, पुतळ्याचे व शिल्पांसह सर्वांचे डिझाईन तयार केले आहे. महाराष्ट्र-मराठा गणाची गणराज्ञी असलेल्या तुळजाभावानीपासून प्रेरणा घेऊन आई जिजाऊंच्या मार्गदर्शनाखाली 'स्वराज्य' स्थापणारे शिवाजी हे मुळातच मातृवादी संस्कृतीचे आदर्श प्रतिक असल्याने त्यांनी श्रीशैलमच्या गणमातेच्या चरणी लीन व्हावे व तिच्या स्त्रीवादी अब्राह्मणी शाक्तधर्माचे अनुयायी व्हावे, यात काहीच आश्चर्य नाही. आयुष्यभर युद्ध मोहिमांमध्ये अखंडपणे कार्यरत असलेले शिवाजी राजे कुठेतरी 4-5 दिवस थांबून निवांत विश्रांती घेतील अशी शक्यताच नव्हती. परंतू महाराज या शक्तीपीठावर तब्बल आठ दिवस थांबल्याचा इतिहास आहे. (24 मार्च 1677 ते 1 एप्रिल 1677) बौद्ध काळपुर्वी, बौद्ध काळात व बौद्ध काळानंतरही देशातील बहुसंख्य तत्वज्ञानी, संशोधक, साहित्यिक, राजे-महाराजे श्रीशैलमला येऊन थांबलेले आहेत, ते केवळ पर्यटक म्हणून नव्हे तर, शपा सांगतात त्याप्रमाणे हे शक्तीपीठ विद्यापीठ होते व येथे तत्वज्ञान, सायन्स, कला व साहित्य या सर्वांच्या विविध शाखांचे संशोधन व अभ्यासक्रम चालत होते. बौद्ध तत्वज्ञानी नागार्जून यांचा येथे विशेष उल्लेख केला पाहिजे. कारण त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ येथून वाहणाऱ्या कृष्णा नदीवर नागार्जून सागर नावाचे मोठे धरण बांधलेले आहे. याच नागार्जूनचे बौद्धमूळ लपविण्यासाठी त्यांना मल्लिकार्जून स्वामी केले असावे किंवा काय अशी शंका यायला जागा आहे.
श्रीशैलमबद्दल कॉ. शरद पाटील लिहीतात, ''आंध्रातील श्रीशैलम हे तंत्राचे केन्द्रीय पीठ शिवाजी-संभाजीच्या काळापर्यंत स्त्रीराज्य म्हटले जात होते आणि दुसऱ्या शतकातल्या (बौद्ध) महाकवी अर्श्वघोषापासून महावैज्ञानिक नागार्जूनपर्यंतचे व त्यानंतरचेही सर्व महायानी आचार्य त्याचे (श्रीशैलमचे) यात्रिक होते. श्रीशैल हे योगीनीसंचिलत विश्वविद्यालय (विद्यापीठ) होते आणि महापंडिता योगिनी सौदामिनीवरून तिच्यासारख्या पूर्वास्पृश्या (आधीच्या अस्पृश्य) त्याच्या पदव्युत्तर विद्यार्थिनी होत्या. स्त्रीराज्याची एवढी प्रदिर्घ, अखंड व उच्चविद्यासंपन्न परंपरा भारताव्यतिरिक्त दुसऱ्या कोणत्याही देशाला लाभलेली नाही आणि तिला बदनाम करून नामशेष करायचे काम भारताशिवाय दुसऱ्या कोणत्याही देशाने केलेले नाही!'' (संदर्भ : शरद पाटील, जात्यन्तक क्रांती व समाजवादी पूर्ती, पान-24. जाड ठसा माझा, कंसातील शब्द माझे.)
विन्टरनित्झ नावाचा संशोधक लिहीतो की, असंग ते धर्मकीर्ती (धम्मकीर्ती) हे बौद्ध महायानी दार्शनिक (तत्वज्ञानी) वज्रयानी होते. ते (सर्व) तंत्राचे अखिल भारतीय पीठ असलेल्या आंध्रातील श्रीशैलची यात्रा करीत होते. नागार्जूनाने तर श्रीशैलला बौद्ध धर्मप्रसाराचे केन्द्र बनविले होते.' (संदर्भ : उक्त, पान-72, जाड ठसा माझा)
5 व्या शतकातील वैदिक-ब्राह्मण महाकवी कालीदासाने आपल्या 'मेघदूत' या महाकाव्यात मेघदूताला स्पष्टपणे ईशारा दिला आहे की, 'रस्त्यात तुला श्रीशैलम पर्वत लागेल. त्या पर्वतावर जाऊ नकोस. कारण तेथे बौद्ध तत्वज्ञानी जोरजोराने हातवारे करून वादविवाद करतात व ब्राह्मणांना निरूत्तर (पराभूत) करतात. त्यामुळे श्रीशैलम पर्वताला वळसा घालून (टाळून) पुढे जा!' श्रीशैलम पर्वतावरील हे शक्तीपीठ केवळ बुद्धीमंतांचे ज्ञानार्जक विद्यापीठ नव्हते तर वैदिक-ब्राह्मणी धर्माविरुद्ध बंड करणाऱ्या विद्रोही क्रांतीकारकांचे आश्रयस्थानही होते. महादेव पार्वतीचा एकमेव खराखूरा पूत्र कार्तिकेय! सिंधूकाळातील हिन्दू पंचांगात (कॅलेंडरमध्ये) या कार्तिकेयाला ''कार्तीक'' महिना म्हणून मानाचे स्थान दिले आहे. कार्तिकेय हा आर्य-अनार्य संघर्षातील आर्यांचा कट्टर शत्रू होता. अनार्यांचा कट्टर शत्रू असलेल्या बळीराजाला दक्षिणेत-पाताळात हद्दपार केले गेले, तसे या कार्तिकेयालाही दक्षिणेत-पाताळात हद्दपार करण्यात आले. बळीराजा आश्रयासाठी पार केरळ-तामीळनाडूपर्यंत पोहोचला. कार्तिकेय मात्र श्रीशैलमच्या स्त्री-गणराज्यात आश्रयाला राहीला. दर महिन्याच्या पौर्णिमेला पार्वती आपल्या प्रिय पुत्राला भेटण्यासाठी श्रीशैलम गडावर येत असते, अशी आख्यायिका आहे. छत्रपतींनी (किमान) आठ दिवस श्रीशैलम गडावर थांबून शक्तीपीठाच्या विद्यापीठात जे काही ज्ञानर्जन व ध्यानार्जन (विपश्यना) केले ते दुसऱ्या शाक्तधर्मी राज्याभिषेकातून स्पष्टपणे साकार झालेले आपणास दिसून येते.



प्रा. श्रावण देवरे
मो. 8177861256

महाराष्ट्रात परतल्यानंतर वैदिक ब्राह्मणी धर्माच्या पेकटात लाथ घालणारा दुसरा राजाभिषेक छत्रपती शिवाजी राजे करू शकलेत ते केवळ या श्रीशैलमच्या शाक्त धर्माची दिक्षा घेतल्यामुळे! छ. शिवाजी स्फूर्ती केन्द्राच्या दरवाज्यातच एक छोटेसे ग्रंथ विक्रीचे दुकान आहे. त्यात छ. शिवाजी राजेंवर लिहिलेली पुस्तके आहेत. बहुतेक सर्वच तेलगू भाषेत आहेत. एकमेव ग्रंथ हिन्दी व इंग्रजीत आहे. केदार महादेवराव फाळके यांचा ''Chhatrapati Shivaji : Kingdom to Empire'' 362 पानांचा हा ग्रंथ 800 रुपयात मिळतो. या ग्रंथात छत्रपती शिवाजी राजेंबद्दलचा इतिहास अवघ्या 53 पानात आटोपतो. 'शिवाजी राजे 24 मार्च (1677) रोजी श्रीशैलमला आलेत व मल्लिकार्जूनचे दर्शन घेतले' एवढ्या एकाच वाक्यात महाराजांच्या श्रीशैलम भेटीचा इतिहास संपतो. (पान-49). स्फूर्ती केन्द्रात ध्यानस्थ बसलेली महाराजांची मूर्ती व पाठीमागे अवतरलेली भ्रमरांभा देवी याबद्दल या ग्रंथात काहीही लिहीलेले नाही. ग्रंथाच्या संदर्भग्रंथांच्या यादीत बहुतेक सर्वच विद्वान लेखकांच्या ग्रंथांची नावे आहेत. मात्र 2021 साली प्रकाशित झालेल्या या ग्रंथात प्राच्यविद्यापंडित कॉ. शरद पाटील यांचा किंवा त्यांच्या ग्रंथांचा साधा उल्लेखही नाही. केवळ दर्शनासाठी कोणीही एकाच मंदिरात आठ दिवस राहात नाही. सर्वसामान्य माणसेसुद्धा एकाच दिवसात दर्शन घेऊन घरी परत येतात. छ. शिवाजी राजे 'राजा असूनही व सतत युद्ध मोहीमांमध्ये कार्यरत असतांनाही' श्रीशैलम पर्वतावर आठ दिवस राहीलेत, त्या आठ दिवसांचा काहीतरी तपशील असेल की नाही? छ. शिवाजी राजेंना ''गवळी'' ठरविणाऱ्या रा. चि. ढेरेंचा उल्लेख संदर्भ यादीत आहे. परंतू त्यांच्या ''त्या'' ग्रंथाचाही उल्लेख नाही व ''त्या'' गवळी संदर्भाचाही उल्लेख नाही. छत्रपती शिवाजी राजेंच्या ''दुसऱ्या राज्याभिषेकाचे सुतोवाच करणाऱ्या प्र. न. देशपांडेंचा उल्लेख संदर्भ यादीत आहे, परंतू शिवाजी महाराजांच्या दुसऱ्या शाक्तधर्मी राजाभिषेकाचा कुठेही उल्लेख नाही. सिंधू संस्कृतीच्या काळापासून ते छ. शिवाजीं-संभाजींच्या काळापर्यंत सतत गजबजत असलेल्या या शक्तीपीठावरील ब्राह्मणविरोधी धर्म, पंथांचे व संस्कृतीचे संदर्भ व पुरावे नष्ट करण्यात आले आहेत. अवशेषही शिल्लक राहू नयेत म्हणून येथील ब्राह्मणांनी कोणतीच कसर ठेवलेली नाही. परंतू ब्राह्मणांनी कष्टपूर्वक व प्रयत्नपूर्वक विध्वंस केलेल्या अब्राह्मणी संस्कृतीचा शोध लावण्यात व ती सिद्ध करण्यात आपल्या महापुरूषांनीही कोणतीही कसर ठेवलेली नाही. या महापुरूषांचा वारसा आपणही पुढे चालू ठेवला पाहिजे, या हेतूस्तव हा लेखन प्रपंच! ■ ■

# रशियन बौद्ध विचारवंतांची गौरवगाथा

मानवतेच्या हितासुखासाठी रशियातील अनेक थोर लेखक, विचारवंतांनी आपले संपूर्ण आयुष्य बौद्ध तत्त्वज्ञानाच्या अभ्यास करण्यात घालवले. त्यांच्या अतुलनीय अन् अद्वितीय कार्याच्या कीर्तीसुगंध आजच्या तरुण पिढीकरिता दीपस्तंभासारखा मार्गदर्शक असून तो अनेक शतकापर्यंत प्रेरणा देत राहील. जगातील प्रत्येक मातीच्या कणाकणात महाकारुणिक भगवान बुद्धांचे विचारचक्र सुगंधित फुलाप्रमाणे दळवळत आहे. जगातील अनेक थोर अनेक विचारवंतांनी अहोरात्र खपून बौद्ध तत्त्वज्ञानाचे अवगाहन व परिशीलन करण्यात आपली सारी हयात चंदनाप्रमाणे झिजविली आणि या सुगंधापासून रशिया देशसुद्धा अलिप्त राहू शकला नाही. रशियातही अशी अनेक थोर नररत्ने जन्माला आली ज्यांनी आपले संपूर्ण आयुष्य व शक्ती या कामी खर्ची घातले. वासिली वासिलीयेव, इवान मिनाएव, सर्जी ओल्देनबर्ग, फ्योदर शेरबानस्को आणि जॉर्ज निकोलाइविच रोएरिच या विचारवंतांची नावे आजही संशोधकांच्या ओठावर येतात. रशियात बौद्ध धम्माविषयी जे प्रेम, आपुलकी आहे ते आधुनिक नसून फार प्राचीन आहे. 1716 साली पीटर दी ग्रेट याने चिनी व तिवेटी बौद्ध धम्माचा अभ्यास करण्यासाठी भिक्खूंचे एक प्रतिनिधी मंडळ पेकिंगला पाठविले होते. प्रसिद्ध रशियन इतिहासकार जी. मिलर यांचाही बौद्ध धम्माचा अभ्यास प्रचंड दांडगा होता. रशियन अकादमीशियन पालास यांनी बौद्धांचे विश्वोत्पत्तिशास्त्र, मूर्तिशास्त्र, बौद्ध विहारातील जीवन याविषयी मौलिक ग्रंथ आणि बुद्धांचे चरित्र लिहिले. प्रस्तुत लेखातून आपण रशियन बौद्ध विचारवंतांचा परिचय करून घेऊया.

**1) वासिली वासिलीयेव (1818 ते 1900) :** रशियन प्राच्य संशोधक आणि अकादमीशियन वासिली वासिलियेव यांनी रशियातील बौद्ध धर्मविषयक अभ्यास कार्याचा पाया घातला. त्यांनी वयाच्या 19व्या वर्षी ‘बौद्धांची धर्मभावना अल्तान गेरेलाचे कार्य’ हा प्रबंध लिहून मास्टरची पदवी प्राप्त केली. त्यांनी दहा वर्षे पेकिंगला घालवून तिबेटी, चिनी व संस्कृत भाषा आत्मसात केल्या. ‘बौद्ध तत्त्वज्ञानाच्या मूळ तत्त्वाविषयी’ हा प्रबंध लिहून डॉक्टरेट पदवी संपादन केली. 1878 साली त्यांचा ‘बौद्ध धर्म, त्याची तत्त्वे, इतिहास व साहित्य’ हा ग्रंथ प्रसिद्ध झाला. वासिलियेव यांच्या साहित्यापैकी ‘मखव्जुत्पत्ती’ या बौद्ध शब्दप्रयोगसंहितेवरील भाष्य हा ग्रंथ सर्वात मोठा व मौलिक समजला जातो. ‘मखव्जुत्पत्ती’ शब्दकोशात समाविष्ट असलेल्या 9565 बौद्ध शब्दप्रयोगांचे तपशीलवार विवेचन त्यात आढळते. याशिवाय ‘बौद्ध साहित्य संप्रदायांचे समालोचन’, ‘तिबेटमधील बौद्ध धर्माचा इतिहास’ आणि तारानाथ यांच्या ‘भारतातील बौद्ध धर्माच्या इतिहासाचे रशियन भाषांतर’ यांची हस्तलिखिते अजूनही उपलब्ध आहेत. ‘बौद्ध तत्त्वज्ञानाची सर्वसाधारण मीमांसा’ या ग्रंथात नवीन कल्पना, धाडसी प्रमेये व अभिजात स्पष्टीकरणे त्यांनी मांडली. निकोलायच्या मते, ‘फ्रेंच शास्त्रज्ञ ई. बुर्नुफ यांच्या मूलभूत ग्रंथाबरोबरच या ग्रंथानेही युरोपात बौद्धविषयक शास्त्रशुद्ध संशोधन कार्याची पायाभरणी केली. वासिलीयेव हा श्रेष्ठ संशोधक रशियन बौद्धांना आपल्या उपकारात चिरंतन काळपर्यंत गुंतवून 27 एप्रिल 1900 रोजी वयाच्या 82व्या वर्षी सेंट पीटसबर्ग येथे मृत्यू पावला.


वासिली वासिलीयेव


इवान मिनाएव


सर्जी ओल्देनबर्ग


फ्योदर शेरबानस्को


जॉर्ज निकोलाइविच रोएरिच

**2) इवान मिनाएव (1840 ते 1890) :** रशियाचा हा एक महान बौद्ध लेखक, विचारवंत होऊन गेला. आपल्या जीवनप्रवासात या विचारवंताने बौद्ध धम्मावरील हस्तलिखिते, बौद्ध पंथावर, कलेवर लिहिलेले अनेक लेख गोळा केले. पदवीप्राप्त करून त्याने 1862 साली परदेशात पाय ठेवला. तब्बल पाच वर्षे ब्रिटिश वस्तू संग्रहालय, बर्लिन विद्यापीठ व राष्ट्रीय ग्रंथालयातील पाली हस्तलिखितांचा अभ्यास करून ‘प्रतिमोक्षसूत्र बौद्ध प्रार्थनाग्रंथ’ 1867 साली अनुवादित करून मायदेशी येऊन प्रकाशित केला. इतिहास, भाषाशास्त्र आणि भारतीय लोककथेत त्यांना विशेष रुची होती. त्यांच्या प्रमुख ग्रंथाचे नाव ‘बौद्ध धर्म, अभ्यास व साधने’ असे आहे. मिनाएव यांनी भारत, श्रीलंका आणि म्यानमारला (ब्रह्मदेश) भेट देवून मनोहारी प्रवासवर्णने लिहिली, हे त्यांचे वैशिष्ट्य होय. त्यांची मुख्य सेवा म्हणजे बौद्ध तत्त्वज्ञान पद्धतीकडे रशियन, पाश्चात्त्य शास्त्रज्ञांचे लक्ष वेधणारे संशोधन केले. इवान मिनायेव यांचे वयाच्या अवघ्या 49व्या वर्षी आकस्मित निधन आले. इवान मिनाएव यांनी आपल्या जीवनप्रवासात 130 हून अधिक ग्रंथ लिहिले. वंशशास्त्र आणि मानवशास्त्राच्या वस्तू संग्रहालयात त्यांनी गोळा केलेल्या वस्तू आणि लेनिनग्राड राज्य ग्रंथालयात त्यांची हस्तलिखिते ठेवण्यात आली आहेत. रशियात बौद्ध धम्माचा शास्त्रीय पद्धतीने जो अभ्यास चालू झाला होता ती परंपरा चालू ठेवण्यात त्यांचे अतिशय मोलाचे योगदान राहिले आहे. दाक्षिणात्य बौद्ध धम्माचा अभ्यास करणारे ते पहिले विद्यार्थी होते. वासिली वासिलियेव यांचे ते शिष्य होते.

**3) सर्जी ओल्देनबर्ग (1863 ते 1934) :** विश्व प्राच्यविशारदात नामांकित, बौद्ध लोकसाहित्य आणि कलेच्या इतिहासाचे अभ्यासक असे रशियन ज्ञानरत्न गणले जातात. त्यांनी वासिली वासिलीयेव आणि इवान मिनायेव या विद्वज्जनांजवळ फारशी व संस्कृतचा अभ्यास केला. मागधी या ‘प्राकृत बोलीच्या ध्वनिशास्त्राची व भाषाशास्त्राची मीमांसा’ या निबंधावर विद्यापीठाची पदवी प्राप्त केली. 1894 साली बौद्ध दंतकथावर (भद्र कल्पवदन जातक माला) प्रबंध लिहून मास्टरची पदवी मिळविली. भरहूत स्तूप आणि बोरोबुदुर (इंडोनेशिया) जगातील सर्वात मोठ्या बौद्ध स्मारकावरील चित्रांचा अर्थ लावण्यात त्यांना भारतीय लोककथांची फारच मदत झाली. ‘बौद्ध साहित्यातील महाभारताच्या प्रश्नाविषयी’ नामक त्यांचा ग्रंथ फार मोलाचा आहे. खरोष्टी भाषेमध्ये लिहिलेल्या आणि ‘धम्मपद’ या बौद्धग्रंथाचे अति प्राचीन प्राकृत भाषांतर समाविष्ट असलेल्या हस्तलिखिताचे त्यांनी केलेले विवेचन या क्षेत्रातील सर्वात मोठे प्रचंड कार्य होय. त्यांनी 1897 साली ‘बिब्लिओतेका बुद्धिका’ नावाची प्रकाशन माला सुरू करून 30 हून अधिक खंड प्रकाशित केले.

**4) फ्योदर शेरबानस्को (1866 ते 1944) :** प्रसिद्ध सोविएत पौर्वात्यशास्त्र अधिकारी फ्योदर शेरबानस्को यांनी बौद्ध तत्त्वज्ञान आणि तर्कशास्त्राच्या अभ्यासाने फार मोठी कीर्ती मिळविली. ‘बौद्ध तर्कशास्त्र’ या ग्रंथाच्या दोन खंडात त्यांनी गोळा केलेल्या माहितीने आणि त्यांच्या कुशल संकलनाने मोठमोठे विद्वानसुद्धा दिपून गेले. एका रशियन खेड्यात जन्मलेला हा श्रेष्ठ नररत्न केवळ रशियाचाच नव्हे तर अखिल बौद्ध जगताचा आधुनिक कोहिनूर ठरला. भारताचे पहिले प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरू आपल्या ‘डिस्कव्हरी ऑफ इंडिया’ या ग्रंथात लिहितात, ‘फ्योदर शेरबानस्को भारतीय तत्त्वज्ञानावर असामान्य प्रभुत्व असलेली सर्वमान्य व्यक्ती होय. बौद्धधम्मावरील त्यांचे कार्य उच्च कोटीचे आहे. थोडक्यात रशियन विद्वानांचे कळस होत. फ्योदर शेरबानस्को यांनी इवान मिलायेव आणि सर्जी ओल्देनबर्ग यांच्या हाताखाली बौद्ध तत्त्वज्ञानाचे धडे घेतले. या दोन विद्वानांच्या प्रभावाने शेरबानस्को यांनी बौद्धधर्म संशोधन कार्यात आपले जीवन वाहून घेतले. ज्ञानात भर घालण्यासाठी त्यांनी 1910 साली भारत दौरा केला. ‘बौद्धधर्म आणि भारतीय तर्कशास्त्र’ या ग्रंथात त्यांनी ‘भारतीय तत्त्वज्ञान ग्रीक तत्त्वज्ञानावर आधारित आहे’ हे मत खोडून सिद्ध केले की, ‘भारतीय तत्त्वज्ञान पूर्णतः भारतीय भूमीवर विकसित झाले आहे आणि भारतीय माणसाच्या स्वतंत्र कार्याचे फलित आहे.’ बौद्धांच्या शिकवणीनुसार ‘ज्ञानाचा व तर्कशास्त्राचा सिद्धान्त’ हा पहिला आणि ‘बौद्ध तर्कशास्त्राचा इतिहास व सिद्धान्त’ याची पद्धतशीर माहिती असलेला दुसरा ग्रंथ 1909 साली प्रसिद्ध केला. ‘बौद्ध धर्माची मध्यवर्ती कल्पना व धर्म या शब्दाचा अर्थ’. ‘बुद्धनिर्वाणाची कल्पना’ आणि नागार्जुनप्रणित ‘सापेक्षतावादावरील प्रबंध’ हे शेरबानस्को यांचे प्रमुख ग्रंथ आहेत. असा हा दिग्गज बौद्ध प्रकांड पंडित 1944 साली उत्तर कझाखस्तानातील बोरोवोयेव वसाहतीजवळ सूचीपर्णयुक्त वृक्षराजीजवळ एका थडग्यात कायमचा विसावला. त्या थडग्यावर कोरले आहे ‘फ्योदर शेरबानस्को याने आपल्या देशाला भारतातील प्राचीन विचारवंतांचे शहाणपण समजावून सांगितले.’



मिलिंद मानकर
मो. 8177866397

**5) जॉर्ज निकोलाइविच रोएरिच (1902 ते 1960) :** प्रा. जॉर्ज निकोलाइविच रोएरिच हे देखील एक उल्लेखनीय रशियन बौद्ध विद्वान होऊन गेले. त्यांनी बौद्धराष्ट्राचे भ्रमण करून बौद्ध ज्ञान संपादिले. बौद्धधम्माचा इतिहास, तत्त्वज्ञान, तर्कशास्त्र, नीतिशास्त्र, साहित्य, कला यांच्या व्यापक ज्ञानामुळे त्यांनी आपल्या विद्यार्थ्यात बौद्धतत्वांविषयी आस्था निर्माण केली. त्यांनी ‘धम्मपदा’चे रशियन भाषांतर करण्याच्या कामी खारीचा वाटा उचलला. बौद्धधर्म सोविएत संघराज्यात अर्थात रशियात वायू वेगाने पसरला याची जाणीव निकोलाय येर्मोश्किन यांच्या ‘सोविएत संघराज्यातील बौद्धधर्म आणि बौद्धजन’ या पुस्तकाच्या आधारे चांगल्याप्रकारे वाचकाला होते. सोबतच झाम्बाल दोझ गोम्बोयेव यांनी पृथ्वीवर युद्धविरहित शांतता नांदावी, स्वार्थीपणा व दुष्टपणाचा स्पर्शनही नसलेली मैत्री प्रत्येकात असावी असा प्रचार करणाऱ्या बुद्धांच्या शिकवणुकीवर नम्र निष्ठा ठेवून भ्रमण केले. भारत भेटीसंदर्भात ते म्हणाले, ‘सारनाथच्या बौद्ध परिषदेला पहिल्यांदा भेट दिली. दुसऱ्या भेटीप्रसंगी ते म्हणाले, ‘आम्ही शक्य तितक्या बौद्ध विहारांना, बौद्ध संस्कृतीच्या स्मारकांना भेटी देण्याचा प्रयत्न केला. कारण भारतीय बौद्धांइतकीच ती आम्हाला अति पवित्र आहेत. बौद्ध धम्मगुरूंनी आणि जनतेने आमच्या प्रतिनिधी मंडळाचे जिव्हाळ्याने केलेले स्वागत आम्ही कधीच विसरणार नाही. सोविएत जनतेप्रमाणेच भारतीय लोकही शांतता व सुरक्षितता या एका समान उद्दिष्टांसाठी झगडत असल्याचे सर्वत्र पाहिले. दुसरीकडे रशियन बौद्ध प्रतिनिधीचे नेते बांदिदो - खाम्बो लामा एशी - दोर्झ शारापोव एका बैठकीत बौद्ध तत्त्वज्ञानावर अचूक बोट ठेवताना म्हणाले, ‘सर्वांनी मानवतेसाठी शांततेचे व सौख्याचे उदात्त उद्दिष्ट प्राप्त करून घेण्यासाठी एकजुटीने झटावे.’ भारत सरकारने बुद्धांची 2500वी जयंती 24 ऑक्टोबर 1956 रोजी मोठ्या प्रमाणात साजरी केली. त्यावेळीही दिल्लीत झालेल्या विशेष समारंभात रशियन बौद्ध प्रतिनिधी, विचारवंत मोठ्या श्रद्धेने सहभागी झाले होते. ■ ■

## जमीनदारी

### अनंतायन



ॲड. अनंत खेळकर
मो. 9370061677

या सृष्टीत काहीही न करता फक्त एका गोष्टीत सतत वाढ होत राहते ती गोष्ट म्हणजे वय . तसेच दुसरी एक महत्वाची बाब म्हणजे मयत पावलेल्या व्यक्तींचे काहीही नुकसान कुणीही करू शकत नाही. पण जिवंत असलेल्या व्यक्तीला कितीतरी यातनांचा सामना करावा लागतो. कधीकधी तर त्याला त्याने न केलेल्या चुकांची देखील शिक्षा भोगावी लागते. तर जिवन हे क्षणभंगुर असते हे माहीत असतानाही माणूस आपल्या अहंकाराचा त्याग करीत नाही. आयुष्य हे एका थेंबासारखे असते पण अहंकार हा समुद्रासारखा असतो . अहंकारी व्यक्ती शिखरावरून कोसळून एका क्षणात खोल दरीत जमीनदोस्त होऊ शकते. म्हणून अहंकाराच्या आहारी गेलेल्या व्यक्तीने हे कधीही विसरू नये की,जे लोक कुलूप किल्ल्या बनवण्याचा व्यवसाय करतात त्यांच्याही घराची कुलूपे तोडल्या जातात. थंडी आणि घमेंडी ह्या दोन्हीही गोष्टी आयुष्यात त्रासदायक ठरतात. म्हणूनच आपल्या मुठीत असलेल्या आनंदाला सतत वाटत रहावे नाहीतरी मृत्युनंतर ह्या मुठी आपोआपच खुल्या होतात . ‘क़दमों के निचे , कितनी भी थकान रहे, मगर लबों पे, बेतहाशा मुस्कान रहे ‘
आज आपल्याजवळ जे आहे ते सर्व येथेच सोडून जावे लागणार आहे. ‘ ख़्वाब टूट जाते है, हकीकत सामने आती है, मौत जब आती हैं, सबकुछ ले जाती है ‘
ह्या जगात माझं माझं म्हणावं असं काहीही नाही. ‘ ये चाहते , ये शौहरतें ये महफ़िलें , ये रौनक, सिर्फ जीने तक, मरने के बाद, घरवाले भी नहीं रखते, जिस्म को देर तक ‘
तर ही आयुष्याची कहाणी आहे. शेवटी काय तर ,‘ हकीकत रूबरू हो तो, अदाकारी नहीं चलती, खुदा के सामने, बंदों की मक्कारी नहीं चलती, तुम्हारा दबदबा , ख़ाली तुम्हारी जिंदगी तक है, किसी की कब्र के अंदर, ज़मींदारी नहीं चलती. ■ ■

# सामाजिक क्रांतीकरिता कोण जबाबदार ?

राजकीय क्रांत्यांच्या आदी नेहमीच सामाजिक व धार्मिक क्रांत्या घडवून आल्या आहेत. हा इतिहासाचा सिद्धांत आहे. अरबांची राजकीय सत्ता बनण्यापूर्वी त्यांना प्रेषित मोहम्मदाने सुरू केलेल्या धार्मिक क्रांतीतून जावे लागले. इतकेच काय भारतीय इतिहास देखील याच निष्कर्षाला पुष्टी देतो. चंद्रगुप्ताने घडून आणलेल्या राजकीय क्रांतीच्या आधी बुद्धाची धार्मिक व सामाजिक क्रांती घडली होती. शिवाजीने घडविलेल्या राजकीय क्रांतीआधी महाराष्ट्राच्या संतांनी धार्मिक व सामाजिक सुधारणा घडवून आणल्या होत्या. शिखांच्या राजकीय क्रांती आधी गुरुनानक यांनी धार्मिक व सामाजिक क्रांती घडवून आणली होती. (डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित ‘जातीप्रथेचे विध्वंसन’ या ग्रंथात खूप छान स्पष्टीकरण दिलेले आहे.) हे पुस्तक जवळपास सर्व लोकांनी वाचलेले असेलच अशी अपेक्षा आहे. परंतु आज ही क्रांती का होत नाही त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे बहुजनांच्या महिला होत. पूर्वीच्या काळी शिक्षण नव्हते. परंतु ज्ञानाची परंपरा अखंडित चालू होती. लिहिता वाचता येणे, पदविका, पदवी मिळणे म्हणजे शिक्षण नव्हे. तर आपण जे काही ज्ञान संपादन करतो त्या ज्ञानाचा फायदा दुसऱ्याला कसा देता येईल याचा सतत विचार करणे आणि ते ज्ञान दुसऱ्याला देण्याचा प्रयत्न करणे हे सुद्धा एक सामाजिक कार्य आहे. पूर्वी लोक प्रत्येक गोष्टीची चिकित्सा करीत होते. आजकाल चिकित्सा करणे, प्रश्न विचारणे लोकांनी सोडून दिलेले आहे. कोणी आपल्या प्रश्नांची उत्तरे देत नाही म्हणून लोक नाराज होतात व प्रयत्न करणे सोडून देतात. मान अपमान याची पर्वा न करता ज्ञानदान करीत राहणे ही खरी समाजसेवा आहे. आजकाल आमच्या महिला कथा ऐकण्याकरता लाखोंची गर्दी करतात व पदरात काय पडते तर कर्मकांड, पाखंड, भोंदूगिरी व फसवेगिरी अशा प्रकारच्या गोष्टी ऐकून घरी येतात. पंडित मिश्रा सांगतात की तुमचा मुलगा जर पास होत नसेल तर बेलाचे पानावर मध टाकून ते शंकराच्या पिंडीवर ठेवा तुमच्या मुलाने अभ्यास नाही केला तरी तो पास होईल. जर अशा प्रकारचे फसवे ज्ञान महिलांना मिळत असेल तर महिलांची अधोगती होईल हे निश्चित. परंतु अशा गोष्टीची चिकित्सा अजूनही आपल्या बहुजन महिला करीत नाही याचे फार दुःख होते. अशा फसवेगिरीपासून दूर राहण्याकरता अनेक महापुरुषांनी आपल्याला मोलाचे मार्गदर्शन केलेले आहे. परंतु बहुजनांच्या महिलांना हे कपटकारस्थान अजूनही समजलेले नाही. त्यामुळेच अजूनही सामाजिक क्रांती घडू शकत नाही हे एक फार महत्त्वाचे कारण आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्याला जो मंत्र दिला आहे तो असा EDUCATE, AGITATE AND ORGANISE. Educate म्हणजे लोकांना शिक्षित करा, सुशिक्षित करा असा आहे. आज ज्यांनी पदवी, पदव्युत्तर शिक्षण घेतले ते दुसऱ्याला शिकवण्याच्या भानगडीत पडत नाही. पदवी घेतली म्हणजे आपल्याला नोकरी लागावी एवढ्या पुरते त्यांचा शिक्षणाचा उद्देश असतो. परंतु डॉ. बाबासाहेब म्हणतात, शिक्षणाचा उद्देश फक्त पदवी मिळवून नोकरी करणे व आपल्या संसारात गुंग होणे असा नाही. समाजाप्रती आपले काही देणे लागते. Pay Back To Society नुसार डॉ. बाबासाहेब सांगतात की तुम्ही तन-मन-धनाने समाजाची सेवा केली पाहिजे. आपल्या उत्पन्नाचा विसवा हिस्सा आपण समाजाला दिला पाहिजे. तेव्हा समाजऋण फेडले असे समजले जाईल. परंतु आज आपण पाहतो की लोक अशा गोष्टीपासून लांब राहताना दिसतात. काही लोकांना फोटोत, नावात, पद, खुर्ची इत्यादी मध्ये जास्त रस वाटतो. मग दिलेले काम पार पडो अथवा न पडो. अशा नकारात्मक भूमिकेमुळे सुद्धा सामाजिक क्रांतीला खिळ बसलेली आहे असे म्हणता येईल. आज आपले नेते हे खऱ्या अर्थाने नेते राहिलेले नाहीत. ते गरीबाची बाजू उचलून धरत नाही. गरिबावर कितीही अन्याय, अत्याचार झाला तर आपले नेते विधानसभेत किंवा लोकसभेत ते प्रश्न उचलून धरत नाहीत. एखाद्याने आवाज उठविला गरिबांच्या शिक्षणाची, स्वास्थ्याची, त्यांच्या राहणीमानाच्या दर्जा खालावत आहे अशी बाजू मांडण्याचा प्रयत्न केला तरी एका व्यक्तीच्या आवाजाकडे कोणी लक्ष देत नाही. म्हणून डॉ. बाबासाहेबांनी आवर्जून सांगितले होते की संघटित व्हा. तुम्ही जर संघटित झाला तर तुमचे प्रश्न हे नक्कीच मार्गी लागतील. परंतु आम्ही बहुजनांनी अजूनही डॉ. बाबासाहेबांचे ऐकलेले नाही व संघटित होत नाहीत. खऱ्या अर्थाने पाहिले तर आपण बहुजन डॉ. बाबासाहेबांना धोका देत आहोत. त्यांचा रथ मागे नेण्यासाठी प्रस्थापित लोक प्रयत्न करतात व काही प्रमाणात यशस्वी होताना दिसतात. आम्हा बहुजनांना प्रत्येक आघाडीवर मात खावी लागते. कारण असे की आम्ही बहुजन संघटित नाहीत. संघटित नसल्यामुळे आपल्या बहुजनाचे खूप हाल होत आहेत. हे सर्वजण आपल्या उघड्या डोळ्याने बघत आहेत. परंतु काहीही करू शकत नाही हि फार मोठी आपल्या देशाची शोकांतिका आहे आणि म्हणूनच सामाजिक क्रांती थांबलेली आहे. आजची युवा पिढी निष्प्रभ होत चाललेली आहे. आमच्या युवा पिढीला चळवळीशी काही देणे घेणे नाही. कारण त्यांना सर्व आयते मिळालेले आहे. कोणताही संघर्ष न करता त्यांचे शिक्षण झालेले आहे, उच्च पदाची नौकरी मिळालेली आहे. खरेतर जुन्या पिढीचा वारसा येणाऱ्या नवीन पिढीने पुढे चालविला पाहिजे. परंतु तसे होताना दिसत नाही. आज होणाऱ्या सामाजिक कार्यक्रमात तरुण दिसत नाही. या सामाजिक कार्यक्रमात आपल्याला फक्त ज्येष्ठ नागरिक पाहायला मिळतात. मग अशाने सामाजिक क्रांती कशी होणार? काही लोक सेवानिवृत्त झाले. परंतु मोजकेच लोक चळवळीत आपले योगदान देत आहेत. बाकीचे सेवानिवृत्त आपल्या नातवाला, आपल्या व्यवसायात अजून पैसे कसे मिळतील याचे नियोजन करण्यात दंग आहेत. हे सेवानिवृत्त लोक फार अनुभवी असतात. अनुभवाचा फायदा इतर लोकांना मिळू शकतो. त्यामुळे चळवळ यशस्वी होण्यास उशीर लागत नाही. परंतु जेष्ठ नागरिक चळवळीत सामील न होता घर कामातच आपला अनुभव वाया घालवितात. त्यामुळे सामाजिक क्रांती थांबलेली आहे. सामाजिक क्रांती न होण्यास अजून एक महत्वाचे कारण म्हणजे लोक आपली अमूल्य अशी मते विकतात. भ्रष्ट राजकारणी लोक मताचे व्यापारी बनलेले आहेत. ते गरीब जनतेला पैशाची लालूच दाखवितात व मत विकत घेतात. असे केल्याने योग्य उमेदवार निवडून येऊ शकत नाही. त्यामुळे साहजिकच बहुजन समाज सामाजिक क्रांती करण्यास दुबळा ठरतो. आज बरीच विद्वान मंडळी आपल्या व माझ्या परिचयाची आहेत. या विद्वान लोकांनी महापुरुषांचा त्याग बघितलेला आहे. हे विद्वान लोक खूप प्रसिद्ध लेखक व वक्ते आहेत. काही वक्ते समाज प्रबोधनाचे काम निरंतरपणे करीत असतात. त्याकरता ते कोणतेही शुल्क आकारत नाही. स्वतःचे पेट्रोल-पाणी गाडी वापरून समाज प्रबोधनाचे कार्य करीत असतात. त्याबद्दल त्यांचे खूप खूप धन्यवाद, आभार. परंतु काही विद्वान असे आहेत की ते समाज प्रबोधन करण्याकरिता मानधनाची अपेक्षा करतात. सेवानिवृत्त शिक्षक, प्राध्यापक, प्राचार्य, अभियंता यांना भरपूर पेन्शन मिळते. तरी ते मानधनाची अपेक्षा करतात. मानधन सुद्धा कमी नाहीच. दहा ते पंधरा हजार असा त्यांचा मानधनाचा आकडा असतो. येणे-जाणे, राहणे व जेवण इत्यादीचा खर्च आपण समजू शकतो. परंतु मानधन सुद्धा पाहिजे. हे आजचे विद्वान लोक काल वस्तीगृहात राहून शिष्यवृत्ती घेऊन शिक्षण घेत होते. त्यांची आर्थिक, सामाजिक परिस्थिती खूपच हलाखीची होती. पण आज त्यांच्याकडे चार लोकांचे मन परिवर्तन करण्याची कला आहे. ते लोकांचे मन परिवर्तन करू शकतात. म्हणून सामाजिक संघटनाचे पदाधिकारी अशा विद्वान मंडळींना प्राधान्य देतात. परंतु मानधन मागितल्यामुळे त्या सामाजिक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची निराशा होते. ते लोक एवढे मानधन देऊ शकत नाही. कारण त्यांची सामाजिक संघटना आर्थिक दृष्ट्या तेवढी सबळ नसते. म्हणून या लोकांना कळकळीची विनंती आहे की त्यांनी छ. शिवाजी महाराज यांच्या मावळ्यापासून आदर्श घ्यावा. हिरोजी इंदुलकर यांना प्रतापगड बांधण्याचे काम सोपविले होते. परंतु काम करताना पैसे संपले होते. हिरोजी इंदुलकर यांनी आपली संपत्ती विकून किल्ला बांधण्याचे काम पूर्ण केले. छत्रपती शिवाजी महाराज करिता मावळे आपल्या प्राणाची आहुती द्यायला तयार होते. ‘होता जीवा म्हणून वाचला शिवा’ हे सर्व लोकांना माहित आहेच. मग आपण लोकांनी यापासून काय शिकावे? आपण आपल्या महापुरुषांचे त्यागाचे, बलिदानाचे असे खूप उदाहरण सांगू शकतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर कसे शिकले? एक पाव व एक ग्लास पाणी पिऊन त्यांनी शिक्षण घेतले. पूर्ण शिक्षण घेतल्यानंतर त्यांनी संपूर्ण आयुष्य समाज कार्यासाठी अर्पण केले. डॉ. बाबासाहेबांचा मुलगा राजरत्न आजारी असताना साहेबाजवळ औषध पाण्यासाठी पैसे नव्हते. म्हणून राजरत्नला गमवावे लागले. एवढेच काय राजरत्नच्या अंत्यविधीसाठी नवीन कापड घेण्यासाठी पैसे नव्हते, तेव्हा माता रमाईने आपल्या लुगड्याचा एक तुकडा कापून मुलाला त्यात गुंडाळले. डॉ. बाबासाहेबांनी पैसे अभावी आपले चार -चार मुले गमावली. आपली पत्नी गमावली. तरीही त्यांनी समाजसेवा सोडली नाही. त्यांच्या त्यागामुळे, बलिदानामुळे, संघर्षामुळे आपल्या लोकांना शिक्षण, नोकरी, गाडी, माडी, साडी हे सर्व काही आयते मिळाले. पूर्वी आपल्याला संधी मिळत नव्हती म्हणून आम्ही बहुजन आपापले पारंपारिक काम करीत होतो. डॉ. बाबासाहेबांनी आपल्या बहुजनांना ती संधी मिळवून दिली म्हणून आज आम्ही बहुजन IAS, IPS, DOCTOR, ADVOCATE, ENGINEER, CLASS-I, II अधिकारी, शिक्षक, प्राध्यापक, प्राचार्य होऊ शकलो. तसेच मान्यवर साहेब कांशीराम यांनी सुद्धा कडक रोटी पाण्यात भिजवून खाल्ली. थंडीपासून संरक्षण व्हावे म्हणून कोट घेण्याकरता दोन-तीन दुकाने फिरले. परंतु तेवढे पैसे नसल्याकारणाने एका दुकानदाराच्या सांगण्यावरून ते स्मशानभूमीत गेले व तेथून पाच रुपयाचा कोट घेतला. प्रसंगी ते रेल्वे स्टेशनवर पेपर अंथरून झोपी गेले. हा सर्व महापुरुषांचा इतिहास आपणास सर्वांना माहीत आहे मी फक्त तो रिपीट केला एवढेच. आपण जर सर्व बहुजन मोहोळासारखे एकत्र आलो, तर कोणीही आपल्या विरुद्ध उभे राहू शकणार नाही. आपल्या आया बहिणीची इज्जत कोणीही लुटणार नाही. गरिबाला रोटी, कपडा, मकान मिळेल आणि मग संत रविदास महाराज यांच्या कल्पनेमधील बेगमपुरा हे गाव वसविण्यात काही अडचण निर्माण होणार नाही. फक्त अट एकच आहे बहुजन समाजातील प्रत्येकाने आपल्या महापुरुषांचा त्याग, बलिदान, संघर्ष, अन्याय, अपमान आठवावा व एकत्र यावे. सामाजिक क्रांतीला सुरुवात होण्यास वेळ लागणार नाही. ■ ■



- महादेव डांबरे
छ. संभाजी नगर

# बिचारा गाढव फूकट मेला



एका गावात गाढवाचा एक समुह राहत होता. त्या गावाला लागूनच एक जंगल होते. त्या जंगलात चार वाघ राहत होते. एके दिवशी चारही वाघ मिळून एका गाढवाची शिकार करतात. त्यामुळे त्या गाढव समूहात प्रचंड भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. आपल्या धूर्त व कपटनीतीचा वापर करून त्या वाघांनी दुसऱ्या एका चपळ व हुशार गाढवाला शोधून काढले. त्या चारही वाघांनी मिळून एक योजना आखली. आपल्या धूर्त राजनीतीचा अवलंब करून त्या गाढवाला धाक दाखवून व ब्रेन वॉश करून आपल्या पुढ्यात करून घेतले. आणि त्याला आपल्याबरोबर जंगलात घेऊन गेले. तो गाढव त्यांच्या खोटेपणाला बळी पडला आणि त्या चारही वाघांबरोबर जाण्यास तयार झाला. आता तो गाढव त्या चारही वाघांबरोबर जंगलात जाऊन राहायला लागला. वाघाच्या सहवासात राहून गाढव देखील वाघासारखा वागू लागला. त्याच्यात बदल होत गेला. आक्रमकता, निर्भीडता, निडरता, चपळता इत्यादी गुण विकसित होऊ लागल्या. हे सगळे होत असतांना त्या चारही वाघांनी त्याच्या वागण्यावर बारीक नजर ठेवली होती. जेव्हा हे सगळे गुण विकसित झाले तेव्हा त्या चारही वाघांनी ते ओळखले व त्या गाढवाला त्याच्या समूहात सोडण्याचे ठरविले. तो त्या समूहात जाऊन आपल्या विकसित गुणांच्या जोरावर धाक दाखवून आपल्या समूहातील गाढवांवर अन्याय करू लागला. आपल्या समूहातील एक गाढव त्या वाघांसाठी पाठवण्याचे नीच कृत्य करु लागला. ठरल्याप्रमाणे तो त्या वाघांसाठी रोज एक गाढव पाठवीत असे. त्यामुळे चारही वाघांना रोज मस्तपैकी मेजवानी मिळत असे. नियमित चाललेल्या त्याच्या नीच कृत्याचा त्याच्या समूहात वाईट परिणाम होऊ लागला. त्यामुळे त्याचा धाक दिवसेंदिवस कमी- कमी होत गेला. व एके दिवशी समूहातील इतर ज्येष्ठ नागरिकांनी एक सामूहिकरीत्या ठराव घेतला की यापुढे कोणताही गाढव त्यांच्यासाठी पाठवायचा नाही. आणि एके दिवशी त्या गाढवाला चांगलाच चोप दिला. तेंव्हा तो गाढव पळत त्या चारही वाघांकडे गेला आणि सांगू लागला, की पूर्वीसारखा माझा धाक राहिलेला नाही. कोणताही गाढव माझा ऐकायला तयार नाही. त्यामुळे आपणासाठी एक गाढव पाठवायला तयार नाहीत. तेंव्हा क्रोधित होऊन त्या वाघांनी त्याला ठार मारूण्याचे ठरविले. आपले भोजन म्हणून त्या गाढवालाच ठार करून आपली भूक शमविली. बिचारा गाढव फूकट मेला. तात्पर्य यावरून असे लक्षात येते की राजकारणात आपल्या राजकीय व आर्थिक शक्तीच्या जोरावर दिनदुबळ्या व कमजोर समाजातील पुढारी माणसाला धाक दाखवून आपल्याकडे वळवून घेतात आणि आपल्यासाठी काम करण्यास भाग पाडतात. त्याचा समाज काही काळ त्याचे अनुकरण करतो. पण काही काळानंतर तथ्य व सत्य कळल्यावर त्या पुढाऱ्याचा प्रभाव कमी- कमी होत असतो. त्यामुळे त्या पुढाऱ्यांना संपवून टाकल्या जातो. स्वार्थी नेते समाजहित व सामाजिक कल्याण कधीही पाहत नाहीत. त्यामुळेच समाजाची अधोगती होत जाते. तेंव्हा, आपण आपला शत्रू ओळखले पाहिजे. आणि कोणत्याही भूलथापा दिल्या तरीही बळी नाही पडले पाहिजे. नाहीतर, बिचारा गाढव फूकट मेला.! अशी हळहळ करण्याची पाळी येईल. सावधान! ■ ■



सत्यवान साखरे
मो.9923203913

# शाश्वत आनंदाचा प्रवास

क्रिकेट मॅच संपल्यानंतर सामनावीर ठरलेल्या खेळाडूला जेव्हा प्रश्न विचारण्यात येतो तुला एवढ्या कठीण परिस्थितीमध्ये शतक मारणे कसे शक्य झाले? तर त्या क्रिकेटपटूचे उत्तर असते, ‘मी खेळाचा आनंद लुटला. समोर परिस्थिती किती कठीण आहे वा बॉलर किती खतरनाक आहे त्याचा मी विचार केला नाही. फक्त मनाची सिद्धता केली मला चांगले खेळायचे आहे, मनाला सकारात्मक आज्ञा देत गेलो, मी चांगला खेळणार... मी चांगला खेळणार... मी चांगला खेळत आहे... आणि तसेच घडत गेले, एवढ्या दडपणात मी शतक साजरा करू शकलो. माझ्या संघाला विजय मिळू देऊ शकलो. या संभाषणातून मनाची ताकद, मनाची क्षमता कुठल्याही परिस्थितीमध्ये साधकाला यशस्वी करते. या जगामध्ये प्रत्येक व्यक्ती आनंदाच्या शोधात असते. परंतु, हा आनंद नेमका कसा शोधावा, हे व्यक्तीच्या शारीरिक, मानसिक, बौद्धिक क्षमतेवर अवलंबून असते. मात्र, मानसशास्त्र आणि मेंदू विज्ञानाच्या संशोधनानुसार, खरी आणि टिकाऊ आनंदाची गुरुकिल्ली आपल्या स्वतःच्या मनात दडलेली आहे. आनंद हा शिकता येऊ शकतो आणि आपला मेंदू अधिक आनंदी होण्यासाठी आपण त्याला प्रशिक्षण देऊ शकतो. आपल्या एकूण आनंदी असण्यामागे बाह्य परिस्थितींचा केवळ थोडा भाग असतो. त्याऐवजी आपले अंतर्गत विचार, भावनिक समायोजन आणि दैनंदिन सवयी या आनंदात मोठी भूमिका बजावतात. मेंदूतील आनंदाच्या प्रक्रियांचे ज्ञान घेतल्यास, आपण आपले विचार जाणीवपूर्वक बदलून अधिक समाधान मिळवू शकतो. जीवनात आपल्याभोवती नेहमीच अनेक सकारात्मक/नकारात्मक घटना घडत असतात, ज्या आपल्या मानसिक स्थितीवर परिणाम करू शकतात. म्हणून, नेहमी सकारात्मक विचार करा आणि आनंदी राहण्याची सवय लावा. ज्या प्रकारे शेतातला तण इतर पिके खराब करतो तसे मनातले तणरूपी नकारात्मक विचार शरीर, मन, बुद्धी रोगट करीत असतो.

विठ्ठल मते
मो. 9423633351

आनंद वाढवण्यासाठी प्रभावी सवयी - 1. नकारात्मक विचारांची पुनर्रचना - विचारांमध्ये सकारात्मक बदल घडविण्यासाठी नकारात्मक विचारांची पुनर्रचना काही विशिष्ट मानसोपचार पद्धती वापरून करता येते. (हे एखाद्या मानसोपचारतज्ञाकडून समजून घेता येते.) 2. कृतज्ञतेचा सराव - आभार प्रदर्शन आणि दैनंदिन सकारात्मक अनुभव नोंदवणे, हे आनंद वाढवते. 3. सहकार्य आणि दयाळूपणाचे आचरण - इतरांसाठी चांगल्या गोष्टी केल्याने ‘ऑक्सिटोसिन’ हे रसायन वाढते, ज्यामुळे आनंद मिळतो. 4. योग, प्राणायाम आणि नियमित व्यायामामुळे ‘एन्डॉर्फिन’ आणि ‘डोपामिन’ स्त्रवतात, ज्यामुळे मनःस्थिती सुधारते. 5. साक्षीभाव (माईंडफुलनेस) आणि ध्यान - हे भावना नियंत्रित करण्यास, तणाव कमी करण्यास आणि वर्तमानावर लक्ष केंद्रित करण्यास मदत करते. 6. मेडिटेशन किंवा ध्यान - विविध प्रकारच्या ध्यान थेरीपीमुळे निकोप, आनंदी मन घडवता येते. 7. सकस, निकोप ज्ञानवर्धक, मूल्यवर्धित साहित्य वाचन, कविता वाचन, प्रसन्न व्यक्तिमत्व असलेल्या लोकांचा सहवास, त्यांच्याशी संवाद यामुळे आनंदी प्रसन्न मन तयार होते.



**बाह्य घटकांची भूमिका :-** व्यक्तीची आंतरिक विचारसरणी जितकी महत्त्वाची आहे, तितकीच बाह्य परिस्थिती व घटकांची भूमिकादेखील आहे. सामाजिक संबंध, आर्थिक स्थिरता आणि शारीरिक आरोग्य हे घटकही आनंदावर प्रभाव टाकतात. परंतु, बाह्य परिस्थितीवर अवलंबून न राहता, जर आपण अंतर्गत सकारात्मक सवयी जोपासल्या, तर दीर्घकालीन आनंद आणि समाधान मिळवू शकतो. सकारात्मक विचारसरणी उपयुक्त असली, तरी केवळ सकारात्मक विचारसरणी पुरेशी नाही. शिवाय, नकारात्मक भावना दडपून टाकणे योग्य नाही. खरा आनंद हा संतुलनातून येतो. सर्व भावनांना स्वीकारून त्यांचा योग्य प्रकारे सामना करून सकारात्मक दृष्टिकोन ठेवणे महत्त्वाचे आहे.

**शाश्वत आनंदाचा प्रवास :-** आनंद हा स्थिर नसतो. तो एक गतिमान प्रवास आहे, जो आपल्या विचारांवर, भावना व्यवस्थापनावर आणि दैनंदिन व्यवहारावर परिणाम करतो. जीवनामध्ये पार पाडावयाच्या प्रत्येक कर्तव्यासाठी, कर्मासाठी, कामगिरीसाठी, ध्येयासाठी आनंद हे साधन आहे, साध्य नव्हे. एक आनंदी मन, प्रसन्न मन स्वतःचे जीवन सुखी करते व आजूबाजूच्या सर्व समाजाला सुद्धा सुखी करू शकतो. हा शाश्वत आनंदाचा प्रवास कसा असतो याचा अनुभव ज्या एका यशस्वी मुलाने घेतला त्याचे उदाहरण याबाबतीत खूपच बोलके आहे. रामेश्वरमच्या समुद्रकिनाऱ्यावर वाढलेला एक लहानसा मुलगा, अबुल पकिर जैनुलाब्दीन अब्दुल कलाम. घर अतिशय साधे, वडील होडीतून मासेमारी करणारे, आई घरकाम करणारी. बालपणातल्या छोट्या छोट्या गोष्टीही त्याला खूप दुःखी करत. शाळेत कपडे साधे असल्याने टोमणे, घरात पैशांची चणचण, अभ्यासासाठी साधनांची कमतरता, या सगळ्याने त्याच्या मनात नकळत एक नकारात्मकता साचत होती. तरुणपणी मोठे स्वप्न होते, भारतीय हवाई दलाचा वैमानिक होण्याचे. तो शेवटच्या टप्प्यापर्यंत पोहोचला, पण निवड होऊ शकली नाही. हे अपयश इतके खोलवर लागले की काही काळ त्याला आयुष्य निरर्थक वाटू लागले. तो छोट्या गोष्टींनी कोसळणारा, मनातच दुःख साठवणारा तरुण बनला. याच काळात तो ऋषिकेशला गेला. तिथे स्वामी शिवानंदजींची भेट झाली. त्यांनी एकच वाक्य सांगितल, ‘तू आनंद बाहेर शोधतोयस, पण तो तुझ्या आत आहे.’ हे वाक्य कलामांच्या आयुष्याला कलाटणी देणारे ठरले. त्यांनी दुःखावर रेंगाळणे सोडले आणि आनंद ही एक शिस्त आहे हे शिकायला सुरुवात केली. रोज प्रार्थना, कामात आनंद शोधणे, अपयशाला गुरू मानणे. हळूहळू त्यांच्या व्यक्तिमत्त्वात सकारात्मक ऊर्जा संचारू लागली. आणि मग? ज्या माणसाला एकेकाळी अपयशाने थांबवले होते, तोच माणूस भारताचा ‘मिसाइल मॅन’ झाला. त्यांनी केलेले अनेक वैज्ञानिक प्रयोग अपयशी झाले, उपहास झाला, पण आता छोट्या गोष्टी त्याला हलवू शकत नव्हत्या. कारण तो आनंदी राहायला शिकला होता. पूर्वीची नकारात्मक ऊर्जा यशाला अडथळा ठरते, पण आनंदाची सवय यशाला ओढून आणते. डॉ. कलाम यशस्वी झाले. कारण ते बुद्धिमान होते म्हणून नव्हे, तर कारण त्यांनी दुःखातही आनंदाची निवड केली. आज जगामध्ये वाढत जाणारा हिंसाचार, व्यक्तीव्यक्तीमधील ताणतणाव, या ताणतणातून घडणारी हिंसा किंवा आत्महत्या पाहिल्या तर मनाच्या आनंद किंवा प्रसन्नता किती महत्त्वाची आहे हे लक्षात येते. आज गरीब हा घटक सोडला तर बहुतांश श्रीमंत, मध्यमवर्ग/नव मध्यमवर्ग यांकडे गाडी, बंगला सोने, चांदी, पैसा, बँक बॅलन्स, पद, प्रसिद्धी सर्व काही आहे. पण कुठेतरी ते मनाची प्रसन्नता गमावून बसले आहेत. ही प्रसन्नता मिळवण्यासाठी कधी ते निसर्गाकडे, कधी यात्रेकडे, कधी नदीकडे, कधी धार्मिक स्थळाकडे धाव घेत असतात. परंतु जो आनंद जी प्रसन्नता त्यांच्या मनातच आहे. त्यांचा ते शोध घेत नाहीत, यालाच आमचे संत, ऋषी, मुनी अज्ञान म्हणतात. या अज्ञानातून ज्ञानाकडे जेव्हा मानवाचा प्रवास होईल तेव्हाच मनाची प्रसन्नता लाभेल. संत तुकाराम महाराज म्हणतात, ‘आनंदाचे डोही आनंद तरंग, आनंदाचे अंग आनंदाचे! ■ ■



स्वाभिमानाचे स्मरणशिल्प -९२

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळा शालिमार चौक नाशिक**

डॉ. बाबासाहेबांच्या पुतळा नाशिक येथील शालिमार जवळील औद्योगिक नगरी येथील आहे. भव्य पुतळा येथील राहणाऱ्या कामगारांनी उभा केलेला आहे या ठिकाणी नाशिक शहरातील मोठ्या प्रमाणात नागरिक येतात दिनविशेष दिनी भव्य कार्यक्रम घेतात.

संवाद मित्र, कपिल नारनवरे
मो9 9370773608

# प्राचीन बौद्ध स्तूपसाठी मंजूर झालेला 5 कोटी रुपयाचा निधी त्वरित द्यावा

### मुंबई विद्यापीठात पाली केंद्र सुरू करा

### आमदार राजकुमार बडोले यांची विधान सभेत मागणी



**गोंदिया :** महाराष्ट्र विधानसभेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या तिसऱ्या दिवशी महामहिम राज्यपालांच्या अभिभाषणावर अभिनंदन प्रस्तावावर बोलताना अर्जुनी-मोरगाव विधानसभा क्षेत्राचे आमदार राजकुमार बडोले यांनी राज्यातील तसेच गोंदिया जिल्हा आणि अर्जुनी-मोरगाव मतदारसंघातील विविध महत्त्वाच्या प्रश्नांकडे सभागृहाचे लक्ष वेधले.

यावेळी बोलताना आमदार बडोले यांनी गोंदिया जिल्ह्यात औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी स्टील प्रोसेसिंग युनिट स्थापन करण्यात यावे, जेणेकरून स्थानिक युवकांना मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होईल, अशी मागणी केली. तसेच मुख्यमंत्री बळीराजा शेत पांदण रस्ता योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने ठोस उपाययोजना कराव्यात, असे त्यांनी नमूद केले. फीडर सेपरेशनमुळे शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या अडचणी दूर करण्याची गरज व्यक्त करत राणी दुर्गावती महिला सक्षमीकरण योजना प्रत्यक्ष गरजू महिलांपर्यंत पोहोचविण्यावर भर देण्यात यावा, अशी मागणी त्यांनी केली. राज्यातील 200 हून अधिक दिव्यांग शाळा बंद झाल्याने विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान होत असून दिव्यांग कल्याण विभागात संवेदनशील व जबाबदार अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली. मुंबई विद्यापीठ परिसरात पाली भवन उभारणीच्या मागणीसाठी आंदोलन करणाऱ्या भंतेजींवर झालेल्या मारहाणीच्या घटनेचा निषेध नोंदवत पाली भवन तातडीने उभारण्यात यावे तसेच उर्दू अकादमीच्या धर्तीवर स्वतंत्र पाली अकादमी स्थापन करण्यात यावी, अशी मागणी आमदार बडोले यांनी केली. भगवान बुद्धांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या नालासोपारा येथील प्राचीन बौद्ध स्तूपाच्या विकासासाठी मंजूर करण्यात आलेले 5 कोटी रुपये अद्याप वितरित करण्यात आले नसल्याकडे लक्ष वेधून निधी तात्काळ उपलब्ध करून देण्याची मागणी त्यांनी केली. गोंदिया जिल्ह्यातील हिंदू-मुस्लिम ऐक्याचे प्रतीक असलेल्या प्रतापगड पर्यटन स्थळाला 'ब' वर्ग पर्यटन दर्जा देण्यात यावा, असेही त्यांनी सभागृहात मांडले. यासोबतच राज्यातील बौद्ध लेण्यांच्या विकासासाठी स्वतंत्र आराखडा तयार करावा, झाडीपट्टी भाग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यात झाडीपट्टी संमेलन आयोजित करण्यात यावे तसेच नवेगावबांध येथे झाडीपट्टी नाट्यकला अकादमी स्थापन करण्यात यावी, अशी महत्त्वपूर्ण मागणीही त्यांनी केली.

मुंबई येथे सुरू असलेल्या अधिवेशनात आमदार राजकुमार बडोले यांनी अर्जुनी-मोरगाव विधानसभा क्षेत्रासह गोंदिया जिल्ह्यातील विविध विकास, सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक प्रश्न प्रभावीपणे मांडत शासनाचे लक्ष वेधल्याने परिसरातील नागरिकांमध्ये समाधान व्यक्त करण्यात येत आहे.



## लाल परी नाटक सादर

**नागपूर :** महाराष्ट्र कामगार कल्याण मंडल 71 व्या प्राथमिक नाट्य महोत्सव सादर झालेले दोन अंकी सामाजिक मराठी नाटक लालपरी एसटी कर्मचारी समस्यात्या कौटुंबीक असो, प्रवासाच्या दरम्यान झालेल्या कडू गोड आठवणी असो, किंवा नोकरीच्या संदर्भात असो, सिद्धहस्त लेखक शीतल विश्वंभर दोडके यांच्या प्रखर लेखणीतून निर्माण झोलेले दोन अंकी सामाजिक नाटक म्हणजे 'लालपरी'. 71 व्या कामगार नाट्य महोत्सवात नुकतेच 21 फरवरी 26 ला सादर झाले. शीतल दोडके यांची कल्पकता दिग्ददर्शनापासून, संगीत, रंगमंच व्यवस्था, कलाकारांकडून काम करवून घेण्याची हातोटी उत्तम दर्जाची होती. त्याचा वाटा एकट्याचा असला तरी त्यांनी ते विभाग वेगवेगळ्या नावांवर सोपविले आहेत. कलावंत स्वतः शीतल विश्वंभर दोडके, सुनीता दोडके, मिलिंद रामटेके, दिवाकर शिर्के, कमलेश रंगारी, अनंत धुलक्ष, अशोक वाचनेकर, उषा वाचनेकर, अनवर शेख, देवेंद्र वानखेडे, प्रभात धेटे, प्रमोद श्रीरामे, प्रांशु गोखले, मधुकर आंबेकर, सोनाली इलमे, लीना पाटील, तमन्ना भोयर, वंश कापसे, तन्मय भोयर. प्रकाश योजना किशोर बत्तासे, पार्श्व संगीत रोशन खोबरागडे, कृती दोडके. रंगभुषा लालजी श्रीवास, वेशभुषा अशोक माटे, रंगमंच व्यवस्था दर्शन सोमकुवर, विजय गायगवळी, विशेष सहकारी सुरेंद्र उके, सुरज दोडके, सुरेश शेंडे, पंकज वानखेडे, विदिशा दोडके इत्यादि.

## भावसार चौकातील कठडे कायमस्वरूपी हटवावे : मागणी

**नागपूर :** शहरातील सी.ए. रोड येथील गांधीबाग मेन रोड वरील भावसार चौकात गेल्या काही दिवसांमध्ये शाळकरी विद्यार्थ्यांच्या अपघातात मोठी वाढ झाली असून पालकांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे. रोज सकाळी 9 ते 9:30 या दरम्यान रस्त्यावर क्रॉस करणाऱ्यांची वाहतूक कोंडी व प्रचंड गर्दी राहते. भावसार चौकातून रस्ता क्रॉस करतांना इंडिया संन हॉटेल समोर वाहतूक पोलिसांनी लावलेले लोखंडी बॅरिकेड्स अपघातांचे कारण ठरले आहे. रस्त्याने जाणारे दुचाकी वाहने बॅरिकेड्सला अडकून अपघात होत असल्याचे चित्र नेहमीचेच आहे. गांधीबाग मेन मार्गावरील इंडिया सन हॉटेल समोर जे महाराष्ट्र पोलीसचे बॅरिकेड्स (कठडे) लागलेले आहे ते हटविण्यात यावे. अशी मागणी शाळकरी विद्यार्थ्यांच्या पालकांनी केली आहे. कारण डाव्या साईडला नक्षत्र बिल्डिंगच्या मागे शाळा आहे. तिथून विद्यार्थी निघतात आणि रोड क्रॉस करतात. त्यामुळे अपघात होतात तो रस्ता कायमचा बंद करावा. अशी मागणी नागरिकांनी केली आहे. येता-जाता विद्यार्थ्यांचा अपघात होऊ शकतो आणि ये-जा करणारे रस्त्यांवर



पायदळ चालणाऱ्या नागरीकांचाही अपघात होऊ शकतो. त्यासाठी (महाराष्ट्र पोलीसचे कठडे) मधातच लावलेले कायमस्वरूपी कठडे हटविण्याची मागणी विद्यार्थ्यांच्या पालकांनी मनपा प्रशासनाला केली आहे. वाहतूक पोलिस आणि जिल्हा प्रशासनाने याची दखल घ्यावी अन्यथा पोलिस आयुक्त कार्यालयासमोर पालक आंदोलन करेल, असा इशारा पालक, सामाजिक संघटनानी दिले आहे.

# 9 वर्षानंतरही जिल्हा सामान्य रुग्णालयाची कामे अपूर्ण; OT अजूनही सुरु नाही : आ. विकास ठाकरे

### स्ट्रॅप - शिवभोजन योजनेतील गैरप्रकार उघड,

### पोलीस विभागाच्या अपयशावरही विधानसभेत जोरदार हल्ला

**नागपूर :** पश्चिम नागपूरचे आमदार तथा नागपूर शहर (जिल्हा) काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष विकास ठाकरे यांनी आज विधानसभेत जिल्हा सामान्य रुग्णालय, मानकापूर येथील गंभीर त्रुटींचा मुद्दा ठामपणे उपस्थित करत प्रशासनाच्या निष्क्रियतेवर तीव्र टीका केली. रुग्णालयाची कामे एक वर्षापूर्वी प्रत्यक्ष सुरू झाली असली तरी ऑपरेशन थिएटर आणि इतर महत्त्वाच्या वैद्यकीय सेवा अद्याप सुरू न झाल्याचे त्यांनी निदर्शनास आणले. तब्बल नऊ वर्षांपूर्वी मंजुरी मिळूनही प्रकल्पाची कामे अपूर्ण असल्यामुळे नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवेपासून वंचित राहावे लागत असल्याचे त्यांनी सांगितले. सध्या सुरू असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात ठाकरे यांनी जिल्हा सामान्य रुग्णालयातील सर्व प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करण्यासाठी आवश्यक अतिरिक्त निधी मंजूर करण्याची जोरदार मागणी केली. पुरेशा संख्येत डॉक्टर, परिचारिका आणि इतर कर्मचारी नियुक्त केलेले नाहीत. कॅन्टीन, पार्किंग, पिण्याच्या पाण्याची सुविधा यांसारख्या मूलभूत सेवा अद्याप कागदावरच असल्याचे त्यांनी सांगितले.

हा रुग्णालय प्रकल्प विकास ठाकरे यांच्या पाच वर्षांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळेच एक वर्षापूर्वी सुरू होऊ शकला. याशिवाय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मेयो आणि एआयआयएमएस रुग्णालयांमधील अपुऱ्या सुविधा व सेवांबाबतही त्यांनी सरकारला जाब विचारत आरोग्य क्षेत्राला सर्वोच्च प्राधान्य देण्याची मागणी केली.



**शिवभोजन योजनेतील गैरप्रकार उघड :** महाविकास आघाडी सरकारने गरजू आणि गरीब नागरिकांसाठी सुरू केलेला शिवभोजन प्रकल्प हा संपूर्ण महाराष्ट्रात लोकहिताचा आणि यशस्वी उपक्रम ठरला असल्याचे सांगताना पश्चिम नागपूरचे आमदार तथा नागपूर शहर (जिल्हा) काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष विकास ठाकरे यांनी सध्याच्या सरकारच्या काळात काही व्यक्ती संबंधित अधिकाऱ्यांशी संगनमत करून या योजनेचा गैरवापर करत असल्याचा आरोप केला. बंद पडलेल्या केंद्रांनाही अनुदान वितरित केले जात असल्याचे त्यांनी सभागृहात मांडले. प्रामाणिकपणे सेवा देणाऱ्या केंद्रांची प्रलंबित बिले तात्काळ मंजूर करून गैरप्रकार करणाऱ्यांवर कठोर व निर्णायक कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली.

नागपूरातील दोन गंभीर घटनांचा उल्लेख करत पश्चिम नागपूरचे आमदार विकास ठाकरे यांनी पोलीस विभागाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. मेयो रुग्णालयात वैद्यकीय तपासणीसाठी नेण्यात आलेल्या आरोपीला तहसील पोलीस स्टेशनच्या कर्मचाऱ्यांनी पळून जाण्याची संधी दिली आणि चार्जशीटमध्ये त्याला 'फरार' दाखवण्यात आले, असा आरोप त्यांनी केला. या प्रकरणात जबाबदार अधिकाऱ्यांवर तातडीने कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली. तसेच 23 फेब्रुवारी रोजी नागपूरमध्ये एका आरोपीने महिला पोलीस अधिकारी आणि त्यांच्या पथकासोबत गैरवर्तन व मारहाण केल्याची गंभीर घटना सभागृहाच्या निदर्शनास आणून देत कायदा व सुव्यवस्था व्यवस्थेतील गंभीर त्रुटी अधोरेखित केल्या.

## महत्वाचे

### सावित्री प्रबोधिनी मंच तर्फे कुलगुरु डॉ. मनाली क्षिरसागर यांचा सन्मान



**नागपूर :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूरच्या इतिहासात पहिल्यांदाच नियमित महिला कुलगुरू म्हणून डॉ. मनाली क्षीरसागर यांची निवड झाली. त्यांना मिळालेला मान संपूर्ण स्त्री जातीचा अभिमान आहे. त्यांच्या रुपाने सावित्रीच्या लेकीचा सन्मान प्रशासनाने केला. त्याबद्दल शासन प्रशासनाचे आभार सावित्री प्रबोधिनी मंच मानते. त्यांच्या निवडीने आम्हा महिलांना अत्यंत आनंद झाला आहे. त्यामुळे सावित्री प्रबोधिनी मंच नागपूरच्या वतीने त्यांचा कार्यालयात जाऊन मंचच्या मुख्य संयोजिका पूजा भूषण भस्मे, त्यांच्या सहकारी बिंदू वासनीक, कल्पना गायकवाड, किशोरी वैरागडे, अशा गजभिये यांच्यासह डॉ. भूषण भस्मे यांच्या हस्ते सन्मान केला व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## धम्म क्लासमध्ये अबुध्यचा वाढदिवस साजरा

### गाडगेबाबांना अभिवादन करून अनोख्या पद्धतीने उत्सव



**नागपूर :** नवीन नरसाळा रोड, स्वागत नगर येथे धम्म क्लासच्या विद्यार्थ्यांसोबत अबुध्य शिल्पा जयपाल टवळे याचा 12 वा वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने स्वच्छता अभियानाचे जनक संत गाडगे बाबा यांच्या जयंतीनिमित्त त्यांनाही अभिवादन करण्यात आले. वाढदिवसाचे औचित्य साधून अबुध्यने उपस्थित मुलांना पाली भाषेतील पंचशीलाचे मराठीत अर्थ समजावून सांगितले. लहान वयातही त्याने धम्मविचार मांडत आदर्श घालून दिला. यावेळी सुनंदा रायपुरे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, 'एकही औपचारिक शिक्षण न घेतलेले गाडगेबाबा आणि उच्चविद्याविभूषित डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यातील फरक फक्त शिक्षणाचा होता; मात्र दोघांचे विचार समाजप्रबोधनाचे आणि परिवर्तनवादी होते. डॉ. बाबासाहेबांच्या मनात गाडगेबाबांविषयी अत्यंत उच्च स्थान होते. मुंबईत असताना गाडगेबाबांचे कीर्तन असल्यास डॉ. बाबासाहेब आवर्जून उपस्थित राहत असत.' गाडगेबाबा दिवसा गावातील रस्ते स्वच्छ करत आणि रात्री चावडीवर बसून कीर्तनाच्या माध्यमातून अंधश्रद्धा दूर करत असत. अशा महान कर्मयोगी संताचा वाढदिवस बहुजन समाजाने सणाप्रमाणे साजरा करावा, असे आवाहन त्यांनी केले.

## ग्रामस्वच्छता ही सामाजिक उन्नतीची गुरुकिल्ली : बंडोपंत बोढेकर

### डॉ. आंबेडकर महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना शिबिर




**चंद्रपूर :** गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली संलग्नित डॉ. आंबेडकर कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष श्रमसंस्कार शिबिर येथून जवळच असलेल्या सिदूर गावात सुरू आहे. या शिबिराच्या दुसऱ्या दिवशी 'स्वच्छ भारत अभियानात युवकांची भूमिका' या विषयांवर ग्रामगीताचार्य बंडोपंत बोढेकर आणि डॉ. श्रावण बाणासुरे (बल्लारपूर) यांचे मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी कार्यक्रम अधिकारी डॉ. राहुल लभाणे होते. तर डॉ. किशोर महाजन यांची उपस्थिती होती. यावेळी बंडोपंत बोढेकर म्हणाले की, संत गाडगेबाबा आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी जनमाणसांत ग्रामस्वच्छतेचा, अंधश्रद्धा निर्मूलनाचा तसेच ग्राम सुधारणेचा विचार प्रभावीपणे रूजविला. त्यामुळे आपण जीवन जगत असताना वैयक्तिक स्वच्छता आणि ग्रामस्वच्छता याकडे विशेष लक्ष दिले पाहिजेत. ग्रामस्वच्छता ही सामाजिक उन्नतीची गुरुकिल्ली आहे. त्यामुळे आपल्या कामाची गुणवत्ता वाढते आणि पर्यावरणपूरक जीवनशैली निर्माण होत असते, असे बंडोपंत बोढेकर म्हणाले. तर डॉ. प्रा. बानासुरे म्हणाले की, युवकांमध्ये काही तरी नवे करण्याची जिद्द असते. त्यामुळे स्वच्छतेची संस्कृती रूजवण्यासाठी युवकांनी स्वयंस्फूर्तीने स्वच्छता अभियानात सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

प्रा. डॉ. लभाने यांनीही शिबिरात होणाऱ्या विविध प्रकारच्या कार्यक्रमाबाबत माहिती देऊन ग्रामस्वच्छतेचे महत्त्व यावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. किशोर महाजन यांनी केले. या कार्यक्रमाचे संचालन लुकेश चलाख यांनी केले तर आभार प्रदर्शन काजल चुनारकर यांनी केले.




## अंनिस तर्फे जोडीदाराची विवेकी निवड संवाद शाळा

### तरुणींनो जोडीदार निर्व्यसनीच निवडावा : गौरव आळणे

**रामटेक :** विद्यासागर कला महाविद्यालय खैरी बिजेवाडा येथील निवासी राष्ट्रीय सेवा योजना शिबिरामध्ये विद्यार्थ्यांसाठी जोडीदाराची विवेकी निवड वर कार्यशाळा घेण्यात आली. यावेळी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे जिल्हा कार्याध्यक्ष तथा नशाबंदी मंडळाचे संघटक गौरव आळणे यांनी नात्यातील सुरेल संवादासाठी जोडीदाराच्या आवडी निवडी, संसार व सहजीवन, कॉम्प्रमाईज- ॲडजेस्टमेंट, आधुनिक कुंडली, जातविरहित विवाह या बाबतची माहिती दिली. रामटेक शाखा कार्याध्यक्षा, महिला सेलच्या समुपदेशक दीपा चव्हाण यांनी कायद्याविषयी ज्वलंत उदाहरणांसह सखोल माहिती दिली, शाखा सचिव शुभा थुलकर व वैशाली वाघमारे यांनी चळवळीचे गीत गायले, जिल्हा युवा कार्यवाह मनीष आडागळे यांनी अंनिसच्या पंचसूत्रीची माहिती दिली. शेवटी शिबिर अधिकारी सतीश महल्ले यांनी नशाबंदी मंडळाच्या व्यसनमुक्तीचा संकल्प दिला. सोबतच व्यसनाचे प्रकार व दुष्परिणामांची माहिती देण्यात आली. यावेळी प्रा. विलास जायभाये, प्रा. गंगा मुंडे, प्रा. कीर्ती जयस्वाल आदींसह 65 विद्यार्थीनींनी कार्यशाळेचा लाभ घेतला. कार्यक्रमाचे संचालन व आभारप्रदर्शन प्रा. ज्योती रणदिवे यांनी केले.

### 2 रे वैदर्भीय आंबेडकरी महिला संमेलन अध्यक्षपदी डॉ. रेखा मेश्राम यांची निवड



**औरंगाबाद :** सावित्रीमाई फुले स्मृतिदिन, जागतिक महिला दिन व प्रा. सतेश्वर मोरे यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित 2 रे वैदर्भीय आंबेडकर महिला संमेलनाच्या अध्यक्षपदी प्रा. डॉ. रेखा मेश्राम यांची निवड करण्यात आली आहे. हे संमेलन दि. 8 मार्च 2026 (जागतिक महिला दिन) रोजी नेर, जि. यवतमाळ येथे संपन्न होणार आहे. या संमेलनाचे उद्घाटन संस्थापक सदस्य दलित पँथर, आंबेडकरोत्तर आंबेडकरी चळवळीचे इतिहासकार व विचारवंत ज. वि. पवार यांच्या हस्ते होणार आहे. प्रा. डॉ. रेखा मेश्राम या रमाई फाऊंडेशनच्या अध्यक्षा आहेत. रमाई फाऊंडेशनच्या माध्यमातून त्या रमाई महिला चळवळीचे साहित्य संमेलन दरवर्षी महाराष्ट्राच्या विविध जिल्ह्यात आयोजित करतात. त्यांची अनेक पुस्तके प्रकाशित आहेत. त्या रमाई मासिकाच्या संपादक आहेत. रमाई मासिक हे केवळ महिलांसाठी चालविले जाणारे मासिक आहे. या मासिकाच्या माध्यमातून महाराष्ट्रमध्ये अनेक महिला लिहित्या करून कवी, लेखक म्हणून पुढे आणल्या आहेत. त्यांच्या या निवडीबद्दल सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## रात्री, रस्त्यावर धावणाऱ्या वाहनांच्या प्रखर हेड लाईटमुळे नागरीक व दुचाकीस्वार त्रस्त

**नागपूर :** अलीकडे रस्त्यावर धावणाऱ्या वाहनांची संख्या वेगाने वाढत आहे. यांच्या हेडलाईटचा प्रखर पांढरा आणि मरक्युरी लाईटमुळे समोरून येणाऱ्या वाहन चालकाचे व पायी चालणाऱ्यांचे डोळे दिपतात, दुचाकीस्वारांना रस्त्यावरील खड्डे, ब्रेकर, किंवा समोर काय आहे दिसतच नाही, पुढे जाऊन यु टर्न घ्यायचा असल्यास समोरुन येणारे वाहन किती अंतरावर आहे हे कळतच नाही अशा स्थितीत अपघात होण्याची दाट शक्यता आहे. अपघाताची मालीका रोखण्यासाठी व्यापक जनजागृती मोहीम राबविणे ही काळाची गरज आहे. सन - 1980-85 च्या दशकात सर्वच वाहनांच्या हेडलाईटला वरच्या भागाला काळा रंग लावणे बंधनकारक होते. त्यामुळे समोरच्या येणाऱ्या वाहन चालकांना या हेडलाईटच्या प्रकाशाचा, त्रास होत नव्हता हा एक चांगला नियम होता, परंतु आता या नियमांचा सर्वांना विसर झालेला आहे. त्यामुळे परीवहन विभाग, पोलीस विभागाचे



दुर्लक्ष झालेले दिसून येत आहे. ही बाब कोणीही गांभीर्याने घेत नाहीत! करीता रस्ते सुरक्षेसाठी व प्रशासनाचे लक्ष केंद्रित करण्यासाठी श्री स्वामी समर्थ जेष्ठ नागरीक मंडळ शामनगरचे सचिव अशोक कातुरे यांनी वर्तमानपत्राच्या माध्यमातून जनजागृती सुरु केली आहे. प्रशासनाने पूर्ववत हेडलाईट ला काचावर काळा रंग लावण्याचा नियम अंमलात आणावा. नागरीकांनी सुद्धा याचा पाठपुरावा करावा. अशी मागणी ज्येष्ठ नागरीकमंडळ कडून करण्यात येत आहे. श्री स्वामी समर्थ ज्येष्ठ नागरीक मंडळ शामनगर नागपुरातील सचिव अशोक कातुरे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

## होळी-धुलिवंदन निमित्त 3 मार्च रोजी शहर बस सेवा बंद

**नागपूर :** होळी सणानिमित्त शहर बस सेवा मंगळवार 3 मार्च रोजी बंद राहणार आहे. नागपूर महानगरपालिकेद्वारे संचालित करण्यात येणारी शहर बस सेवा (आपली बस) होळीच्या दिवशी 2 मार्च रोजी सायंकाळी 7 वाजेपासून आणि मंगळवार 3 मार्च रोजी धुलिवंदननिमित्त संपूर्ण दिवस बस सेवा बंद ठेवण्याचा आली आहे. बुधवारी 4 मार्च रोजी बसेसची वाहतूक पूर्ववत होईल, अशी माहिती मनपाच्या परिवहन विभागाने दिली आहे.




## महावितरणच्या स्मार्ट मीटर बसविण्याच्या कामगिरीचा 'बिग इम्पॅक्ट' पुरस्काराने गौरव

**नागपूर :** सर्वाधिक अत्याधुनिक स्मार्ट मीटर बसवून देशात प्रथम क्रमांक पटकावण्याच्या महाराष्ट्राच्या कामगिरीत मोलाचा वाटा उचलणाऱ्या महावितरणचा 'बिग इम्पॅक्ट' पुरस्काराने मुंबई येथे बुधवारी (25 फेब्रुवारी) गौरव करण्यात आला. मुंबईतील सहारा स्टार हॉटेलमध्ये आयोजित या कार्यक्रमात 92.7 बिग एफएम या लोकप्रिय रेडिओ चॅनलच्या वतीने विविध क्षेत्रात कल्पकता व नाविन्यपूर्ण उपक्रमाद्वारे समाजावर सकारात्मक प्रभाव टाकणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांचा पुरस्काराने गौरव करण्यात आला. मुंबई महानगरपालिकेच्या महापौर श्रीमती रितू तावडे आणि अभिनेत्री ईशा देवोल यांच्या हस्ते महावितरणच्या वतीने कार्यकारी संचालक धनंजय औंढेकर, मुख्य अभियंता प्रवीण परदेशी, मुख्य जनसंपर्क अधिकारी भारत पवार यांनी हा पुरस्कार स्वीकारला. राज्याचे माहिती तंत्रज्ञान आणि? सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार, जेष्ठ अभिनेते बोम्मण ईराणी यांची प्रमुख उपस्थिती या कार्यक्रमाला होती. पुरस्कार वितरणाच्या नेत्रदिपक कार्यक्रमाला




तर सिनेसृष्टी, सामाजिक, राजकीय, उद्योग, कला क्षेत्रातील नामवंत उपस्थित होत्या. ग्राहकांना अचूक बिलासोबत विविध सुविधा उपलब्ध करून देणारे 88.50 लाख अत्याधुनिक स्मार्ट मीटर बसवून महाराष्ट्राने देशात प्रथम क्रमांक मिळविला आहे. राज्याच्या या यशात महावितरणची कामगिरी प्रमुख आहे. शंभर टक्के अचूक बिल, ग्राहकांना दर तासाला मोबाईलवर विजेचा वापर समजण्याची सुविधा, सवलतीच्या वीजदराच्या काळात अधिक वीजवापराची उपकरणे वापरण्याचे नियोजन करणे व विजेचा वापर नियंत्रणात ठेवण्याची संधी असे अनेक लाभ असलेले स्मार्ट मीटर महावितरणकडून मोफत बसविण्यात येत आहेत. स्मार्ट मीटर बसविलेल्या घरगुती वीज ग्राहकांना दिवसाच्या वीज वापराबद्दल प्रती युनिट 80 पैसे टीओडी सवलतही देण्यात येत आहे. तसेच औद्योगिक आणि वाणिज्यिक वीज ग्राहकांनाही सकाळी 9 ते सायंकाळी 5 या कालावधीतील वीज वापरासाठी वीजदरात सवलत देण्यात येत आहे. राज्यात 9 फेब्रुवारी ते 23 फेब्रुवारी या कालावधीत स्मार्ट मीटर जनजागृती पंधरवडा साजरा करण्यात आला. यात विविध उपक्रमांच्या माध्यमातून स्मार्ट मीटरच्या लाभांबाबत राज्यभरात जनजागृती करण्यात आली.

### कारुण्याचे महाकाव्य 'गाथा रमाईची' हा ग्रंथ अनमोल ठेवा



**अकोला :** महामाता रमाई कारुण्याचे जागतीक महाकाव्याचा अनमोल ठेवा ग्रंथ असल्याचं प्रतिपादन 'गाथा रमाईची' ग्रंथावर समिक्षणपर बोलतांना सुप्रसिद्ध वकील तथा आंबेडकरी विचारवंत ॲड. प्रजानंद उपर्वट यांनी बोलतांना व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षा जया भारती होत्या तर प्रमुख उपस्थितीमध्ये लोकस्वातंर्त्यचे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष संजय एम.देशमुख, प्रा.डॉ.संतोष हुशे, नारायणराव अंधारे, पत्रकार निशाली पंचगाम, यांची विचारमंचावर प्रमुख उपस्थिती होती. त्यागमूर्ति रमाई वरील पंजाबराव वर लिखीत 'गाथा रमाईची' हा ऐतिहासिक व महत्वपूर्ण ग्रंथ असल्याने तो ग्रंथ संग्रही ठेऊन मायमाऊलीने हा ग्रंथ अवश्य वाचावा आणि मनामध्ये साठवून आदर्श इतरांसमोर ठेवाल्यास तुमच्या जिवनाचे सोने झाल्या शिवाय राहणार नाही असेही ते म्हणाले. यावेळी ज्येष्ठ पत्रकार गजानन सोमाणी यांना 'लोकस्वातंत्र्य पत्रकार भुषण सेवागौरव' तर अनिल मावळे, बुढन गाडेकर, कैलास टकोरे, दिपक शिरसाट, संघपाल शिरसाट यांना प्रभावी पत्रकारिता गौरव पुरस्कारांनी आणि गजानन थोरात व दिलीप नवले यांना सामाजिक सेवा गौरव पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. संचालन प्रा. देवाबाबू लुले तर आभार प्रदर्शन कादंबरीकार पुष्पराज गावंडे यांनी मानले.

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एम.आय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648